


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




हिऱ्याप्रमाणे चमकत राहो आपल्या कर्तुत्वाची ख्याती
मा.श्री. सुमित संतोष वर्मा
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
महाराष्ट्र उपाध्यक्ष : महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना । संस्थापक सुमित वर्मा युवा मंच
प्रकाश लहू गायकवाड (जिल्हाध्यक्ष) । अनिकेत शियाळ (शहराध्यक्ष) । प्रमोद जाधव । सुमित फुलारी । निखिल देशपांडे । प्रकाश गायकवाड । मनिष मेढे । अजय दावभट
ऋषिकेश हजारे । अमोल कर्पे । अमोल बोरुडे । अर्जुन वायभसे । विशाल जगताप । तुषार इंगळे । अक्षय वराट । शुभम गरड । शुभम धामणे । योगेश गुंड । दिपक मगर
संदिप काळे । क्षितिज वाणी । पंकज साठे । सुरज वाणे । स्वप्निल वाघ । आकाश साळवे । अक्षय कोटा । दिनेश जाधव । योगेश गडप्पा । मयुर डहाळे । राहुल वर्मा
आकाश साबळे ।अक्षय आरडे । देवेंद्र मुनोत । कौशल रासने । मयुर वर्मा । अपुर्व मुळे । जालिंदर बांडे । योगेश मोटे । किरण देवकर । निखिल बुरा । प्रमोद ठाकुर
सुमित उगार । सनी वैराळ । विजय पुंड । प्रविण गायकवाड । अमनोल रामनानी । साहील घोत्रे । अमोल शिंदे । रमेश गांधी । शंकर गोरे । सतिश हिरानंदानी
अभिषेक कलमदाणे । अमोल भालसिंग । आयुष नागरे । आयुष पाथरकर । प्रविण गायकवाड । मयुर मिसाळ । सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी...

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०५.०९.२०२५ | अंक नं. १३४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020




# विसर्जन मिरवणुकीसाठी ड्रोन, सीसीटीव्हीसह पोलीस बंदोबस्त तैनात

**१५०० गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई, ५८० गुन्हेगार केले एक दिवसासाठी हद्दपार**

नगर – नगर शहरासह जिल्ह्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाकडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. जिल्ह्यात तीन हजार ११९ लहान मोठ्या सार्वजनिक व खासगी गणेश मंडळांनी श्री गणेशाची स्थापना केली असून ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीच्या दिवशी बाप्पाला निरोप देण्यात येणार आहे. दरम्यान, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ४ हजार पोलीस व होमगार्ड यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. बाहेरच्या जिल्ह्यातून बंदोबस्त मागविण्यांत आला आहे.

नगर शहरात पहिला मानाचा गणपती असलेल्या ग्रामदेवत विशाल गणपती मंदिरात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते श्री गणेशाची उत्थापन पूजा होऊन सकाळी १० वाजता मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. माळीवाडा विशाल गणपती नंतर मानाची गणेश मंडळे मुख्य मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. मिरवणूक मार्गावर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. तसेच स्थानिक दुकाने व इतर आस्थापनांच्या कॅमेऱ्यांची ही मदत मिरवणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी घेतली जाणार आहे. मिरवणूक मार्ग व त्या लगतच्या परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन तैनात करण्यात येणार आहेत. केडगाव उपनगर, सावेडी उपनगर परिसरातही अनेक मंडळे स्वतंत्र मिरवणुका काढणार आहेत.

जिल्ह्यात यंदा गणेशोत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जात आहे. जिल्ह्यात ३ हजार ११९ लहान-मोठ्या सार्वजनिक व खासगी गणेश मंडळांसह २२१ गावांत 'एक गाव एक गणपती' संकल्पनेतून श्री गणेशाची स्थापना केली आहे. नगर शहरासह जिल्ह्यातील संगमनेर, श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव, कोपरगाव वा प्रमुख शहरासह ग्रामीण भागातील छोट्या मोठ्या मंडळातील श्री गणेशाचे उद्या विसर्जन केले जाणार आहे. त्यासाठी संबंधीत प्रभारी पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## बॉम्ब शोधक पथक करणार तपासणी

नगर शहरातील विसर्जन मिरवणूक मार्गावर पोलिस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथक पोलिस उपनिरीक्षक अंबादास हुलगे व त्यांची टेक्निशियन टीम संजय येठेकर, दिनेश पळसकर, शरद वर्पे, अजय कदम, सुभाष पठारे, देवेंद्र सगळगिळे हे तांत्रिक साहित्यासह स्निपर डॉग 'लुसी' च्या मदतीने घातपात विरोधी तपासणी करणार आहेत.

## जिल्ह्यासाठी तैनात बंदोबस्त

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली २ अप्पर पोलीस अधीक्षक, ७ पोलीस उपअधीक्षक, ३५ पोलीस निरीक्षक, ३१ सहाय्यक निरीक्षक, ८० उपनिरीक्षक, २१०० पोलीस कर्मचारी, १६५० होमगार्ड, आरसीपीच्या तीन तुकड्या, क्यूआरटीच्या दोन तुकड्या, एसआरपीएफची एक कंपनी, साध्या वेशातील पोलिसांची पथके, छेडछाड विरोधी पथक, ध्वनी प्रदूषण पातळी मोजण्यासाठी स्वतंत्र पथक असणार आहे.

## ५८० गुन्हेगार केले हद्दपार

विसर्जन मिरवणुकीच्यावेळी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. भारतीय न्याय संहिता कलम १२६, १२७, १२८,१२९ व १६८ नुसार सुमारे १५०० गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच भारतीय न्याय संहिता कलम १६३ नुसार ५८० गुन्हेगारांना विसर्जन मिरवणुकीच्या काळात एक दिवसांसाठी हद्दपार करण्यात आले आहे

# मुलीला रेल्वेत क्लर्कची नोकरी लावण्याचे आमिष दाखवत १८ लाखांची फसवणूक

**६ जणांच्या टोळीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल**

नगर – मुलीला रेल्वे मध्ये क्लर्कची नोकरी लावण्याचे आमिष दाखवत नगरमधील सेवानिवृत्त व्यक्ती कडून वेळोवेळी सुमारे १८ लाख रुपये घेतले. त्यानंतर बनावट नियुक्ती पत्र देवून फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात ६ जणांच्या टोळी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विजय वामन केळगंद्रे (वय ६०, रा. संतोष रेसिडेन्सी, चिपाडे मळा, सारसनगर, मूळ रा. खरवंडी कासार ता. पाथर्डी) यांनी ४ सप्टेंबर रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे पशुसंवर्धन विभागात नोकरीला होते. २ वर्षांपूर्वी ते सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांची आरोपी अनिल भास्कर पडघलमल (रा. डॉ. वने हॉस्पिटल जवळ, राहुरी) याच्याशी ओळख होती, त्याने त्यांच्या मुलीला रेल्वे खात्यात क्लर्कची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत त्यांची ओळख संतोष चंद्रकांत कटारे (रा. मुरबाड रोड, कल्याण, ठाणे) व सुकुमार पवार (रा. बारागाव नांदूर, ता.राहुरी) यांच्याशी करून दिली.

मुलीला नोकरी लावण्यासाठी या तिघांनी आणि त्यांच्या अनोळखी ३ साथीदारांनी फिर्यादी केळगंद्रे यांचा विश्वास संपादन करून त्यांच्या कडून १७ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २०२५ दरम्यान नगरमधील वाडियापार्क, मुंबई मध्ये व्ही. टी.स्टेशन परिसरातील एका हॉटेल मध्ये आणि एका हॉस्पिटल मध्ये वेळोवेळी एकूण १८ लाख रुपये घेतले. त्यानंतर त्यांच्या मुलीच्या नावे रेल्वे खात्यात क्लर्क (वर्ग ३) चे नियुक्तीपत्र दिले. ते नियुक्ती पत्र घेवून फिर्यादी हे मुलीला कामावर रुजू करण्यासाठी घेवून गेले असता, ते नियुक्तीपत्र बनावट असल्याचे त्यांना समजले. त्यामुळे या ६ आरोपींनी आपली फसवणूक केल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी ६ जणांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१६ (२), ३१८ (४), ३३६ (२), ३४० (२), ३ (५) प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.




**केदारनाथ मंदिराचा देखावा**

वसंत टेकडी येथील संदेशनगर मधील युवकाने घरगुती गणेश उत्सव साजरा करताना केदारनाथ मंदिराचा देखावा सादर केला. (छाया - विजय मते)

# छत्रपती संभाजीनगर रोडवर वाहनाच्या शोरूममध्ये चोरी

## रोख रकमेसह मोबाईल, लॅपटॉप चोरट्यांनी केला लंपास

नगर – छत्रपती संभाजीनगर रोडवरील शेंडी शिवारात असलेले जीप मोटर्स या वाहनाच्या शोरुम च्या दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी शोरूम मधील रोख रक्कम, मोबाईल, लॅपटॉप असा २ लाख ४५ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ ते ४ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत शोरूम चे व्यवस्थापक आहेदी रशीद सय्यद (वय २६, रा. फकीरवाडा, अहिल्यानगर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व शोरूम मध्ये इतर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास शोरूम बंद केले व ते घरी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी शोरूम उघडण्यासाठी आले असता त्यांना शोरूम च्या काचेच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले, त्यांनी आतमध्ये जावून पाहणी केली असता कार्यालयात उचकापाचक झालेली दिसली.

तसेच कपाटातील रोख रक्कम मोबाईल, लॅपटॉप असा २ लाख ४५ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरीला गेलेला आढळला. याबाबतची माहिती त्यांनी एमआयडीसी पोलिसांना कळविली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जावून पाहणी केली. याबाबत सय्यद यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३३१ (४), ३०५ (अ) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011

ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

सुयणा कॉर्नर
ड्रायफ्रुट्स् अँड किराणा
फ्री होम डिलिव्हरी
Whatts App 9822067373
ब्रँच १ : तेलीखुंट 9822067373
ब्रँच २ : सावेडी प्रोफेसर चौक 9011696696

उठाला (पगडी रस्म)

भले ही वो इस दुनिया को
अलविदा कह गए हो,
लेकिन उनकी यादे
आज भी हमारी
जेहन में जिंदा है ।



स्व. सुनिल तिलकराज आनंद

सबको सुचित करते हुए दु:ख होता है की, हमारे पुज्य पिताजी
श्री. सुनिल तिलकराज आनंद
(संचालक, पंजाबी सेवा समिती, अहिल्यानगर) इनका
मंगलवार दि. २ सप्टेंबर २०२५ को
दु:खद निधन हुआ है।

उठाला (पगडी रस्म)
सोमवार दि. ८/९/२०२५ को दोपहर ३ से ४ के बीच
गुरुद्वारा भाई दया सिंघ जी, गोविंदपुरा, अहिल्यानगर यहाँ होगा।

• शोकाकुल •
कौशल आनंद
आनंद, जग्गी, चानना, सेठी, वासन, साहनी परिवार

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of
Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles,
Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# १५ हजारांची लाच मागणाऱ्या वायरमनवर गुन्हा दाखल

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची भिंगारमध्ये कारवाई**

नगर - भिंगार येथील महावितरण कार्यालयात कार्यरत बाह्यस्त्रोत वायरमन अजय प्रल्हाद चाबुकस्वार (वय ३४) याने वीज ग्राहकास वीज मीटर बसवून देण्यासाठी १५ हजार रूपयांची लाच मागितल्याने नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याच्यावर कारवाई केली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार यांचे राहते घरातील वीज मीटर वायरमन चाबुकस्वार यांनी टेस्टिंगसाठी काढून नेले होते. हेच वीज मीटर पुन्हा बसविण्यासाठी त्याने १५ हजार रूपये लाचेची मागणी केली. या संदर्भात तक्रारदाराने २७ जानेवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर कार्यालयात तक्रार दाखल केली. २८ जानेवारी रोजी झालेल्या पडताळणी दरम्यानही चाबुकस्वार याने पंचासमक्ष लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली होती. मात्र लाच स्वीकारली नव्हती, याबाबत कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला होता. तो प्राप्त झाल्यावर ४ सप्टेंबर रोजी लाच प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक छाया देवरे, अंमलदार चंद्रकांत काळे, सचिन सुदुक, गजानन गायकवाड, दशरथ लाड यांच्या पथकाने केली.

# १५ दिवसांत तपास आणि २ महिन्यात न्यायालयाचा निकाल; नगरमध्ये लुटमार करणाऱ्या दोघांना सुनावली ५ वर्षांची शिक्षा

नगर - नगर शहरातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या जलदगतीच्या तपासामुळे अवघ्या दोन महिन्यांत जबरी चोरी प्रकरणात आरोपीस ५ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. या कारवाईचे विशेष म्हणजे नवीन कायद्यानुसार पंचनामे व इतर कामकाज पूर्ण करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले व जलदगतीने खटल्याचा निकाल लागला आहे. रूपेश विठ्ठल रूपनर (रा. माका, ता. नेवासा) व विजय दिलीप झेंडे (रा. कोठी, अहिल्यानगर) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत.

शहरातील रिक्षा चालक रवींद्र काशिनाथ लांडगे (वय ३२, रा. पिंपळगाव लांडगा, ता. नगर) यांना १ जून रोजी पहाटे दोघांनी माळीवाडा येथून कल्याण रोडला जायचे आहे असे सांगून रिक्षात बसून गेले व रेल्वे उड्डाणपुलाजवळ मारहाण करून त्यांच्याकडील मोबाईल व रिक्षा बळजबरीने चोरून नेण्यात आली होती. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (६), ३ (५) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता.

सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख व गुन्हे शोध पथकाने तातडीने तपास सुरू करून अवघ्या सहा तासांत पहिला आरोपी रूपेश विठ्ठल रूपनर (रा. माका, ता. नेवासा) याला अटक केली. त्याच्याकडून जबरी चोरीस गेलेली ८० हजार रूपये किमतीची ऑटोरिक्षा जप्त करण्यात आली. यानंतर फक्त २४ तासांत दुसरा आरोपी विजय दिलीप झेंडे (रा. कोठी, अहिल्यानगर) यालाही अटक करण्यात आली. झेंडे हा अटक झाल्यापासून न्यायालयीन कोठडीत राहिला, तर रूपनर हा जामीन झाल्यानंतर पसार झाला होता व न्यायालयात हजर राहत नव्हता.

दरम्यान, सदर प्रकरणाचा तपास अवघ्या १५ दिवसांत २ जुलै २०२५ रोजी पूर्ण करून दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. तपासामध्ये पंचनामे व पुरावे संकलित करण्यासह सर्व प्रक्रिया नव्या कायद्यानुसार करण्यात आली. सदर खटला अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी प्रतिभा पाटील यांच्या न्यायालयात चालविण्यात आला. सरकारी अधिवक्ता म्हणून भाग्यश्री कुंजर यांनी काम पाहिले. न्यायालयाने दोघा आरोपीस ५ वर्षांची सक्तमजुरी व ५ हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली. दंड न भरल्यास आणखी तीन महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागणार आहे. या संपूर्ण तपासामध्ये पोलिस निरीक्षक दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक देशमुख, पोलीस अंमलदार लक्ष्मण बोडखे, विशाल दळवी, सोमनाथ केकाण, सत्यम शिंदे, प्रतिभा नागरे यांच्यासह कोर्ट पैरवी म्हणून अंमलदार राजेंद्र माळी, सचिन डमाळे, सविता शेंडगे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रकरणामुळे पोलिसांच्या तपासकौशल्यामुळे न्यायालयीन प्रक्रिया जलदगतीने पार पडून समाजात कायद्याविषयी विश्वास दृढ झाल्याचे समाधान नागरिकांमध्ये व्यक्त केले जात आहे.

# मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी प्रत्येक प्रभाग समिती कार्यालय हद्दीत एक गाडी

**महापालिकेसाठी नागरिकांची सुरक्षा हेच प्राधान्य : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे**



नागरिकांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यासाठी महापालिकेत आयोजित बैठकीत बोलताना मनपा आयुक्त यशवंत डांगे आदी. (छाया - लहू दळवी)

नगर - शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कुत्रे पकडून व त्यांचे निर्बीजीकरण करण्यासाठी प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयाच्या हद्दीसाठी एक गाडी व कर्मचारी अशा चार नियुक्त करून कारवाई केली जाईल. तसेच, शहरात कुत्र्यांसाठी फिडिंग पॉईंट तयार करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येईल. हॉटेल व स्लॉटर हाऊसमधील वेस्ट रस्त्यावर किंवा कचरा कुंडीवर येणार नाही, यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. प्राण्यांसह नागरिकांची सुरक्षाही महत्त्वाची आहे. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य राहील, असेही यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

मागील काही दिवसांत अहिल्यानगर शहरात काही नागरिकांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना घडल्या. या पार्श्वभूमीवर नागरिक व प्राणी मित्राच्या सूचना जाणून घेत, कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यासाठी यशवंत डांगे यांनी महानगरपालिकेत बैठक बोलावली होती. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, माजी नगरसेवक निखिल वारे, मनोज कोतकर, विनीत पाऊलबुद्धे, बाळासाहेब पवार, प्रकाश भागानगरे, काका शेळके, कोंडवाडा विभाग प्रमुख दुष्यंत बत्तुल, प्राणी मित्र संघटनेचे सुमित वर्मा, श्रीमती कामत आदींसह इतर प्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते. या प्रतिनिधींनी काही सूचना मांडल्या. निर्बिजीकरण शस्त्रक्रियेबाबत काही शंका उपस्थित केल्या.

निखिल वारे, मनोज कोतकर, बाळासाहेब पवार, काका शेळके, विनीत पाऊलबुद्धे यांनी मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, एखादी दुर्घटना घडल्यास प्राणी मित्र संघटना जबाबदारी घेणार का, असा जाब विचारला.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, महानगरपालिकेने पिंपळगाव माळवी येथे १०० ते १५० कुत्र्यांना ठेवता येईल एवढ्या क्षमतेचे शेल्टर हाऊस उभारले आहे. शहरात सुमारे २५ हजार कुत्री असून मागील वर्षभरात ५०४१ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. ठेकेदार संस्थेला कुत्री पकडण्यासाठी केवळ १०.५९ लाखांचे देयक दिले आहे. अद्याप २९ लाखांची देयके थकीत आहेत. कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रिया इन कॅमेरा केल्या जात आहेत. त्यामुळे केलेले आरोप मोघम आहेत. प्राण्यांच्या सुरक्षेबाबत प्राणी मित्र संघटना काम करत आहेत. मात्र, शहरातील नागरिकांवर होणारे कुत्र्यांचे हल्ले दुर्लक्षित करता येणार नाहीत. हिंस्र व पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी व त्यांच्यावर उपचार करण्यासाठी स्वतंत्र उपाययोजा केल्या जातील. फिडिंग पॉईंटसाठी प्राणी मित्र संघटनांनी शहरात सर्वेक्षण करून कुठे कुठे पॉईंट करता येतील, त्याबाबत पाहणी करून अहवाल द्यावा. या संदर्भात पुन्हा महिनाभराने एकत्रित बैठक घेऊन काही उपाययोजना केल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

तसेच, मोकाट कुत्र्यांसाठी शेल्टर हाऊस व निर्बीजीकरण शस्त्रक्रियेसाठी काही कंपन्यांच्या सीएसआरमधून मदत उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातील. मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांना उपचारासाठी दहा हजारांपर्यंत आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात येईल. मोकाट कुत्र्यांबाबत काम करण्यासाठी आम्ही काम करू, असे संघटना सांगतात. प्रत्यक्षात काम करायची वेळ आल्यावर, आम्ही संपर्क केल्यावर प्रतिसाद मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. महापालिका ही संस्था आहे, कामाची एक कार्यपद्धती आहे, इथे येऊन जे भाषण केले जाते, ते भाषणापुरतेच असते. प्रत्यक्षात काम महानगरपालिकेलाच करावे लागते. इथे प्राण्यांच्या विरोधात कुणीही नाही, सर्व प्राणी प्रेमीच आहेत. मात्र, मागील काही दिवसातील घटनेचे गांभीर्य पाहता नागरिकांची सुरक्षा हेच महानगरपालिकेचे प्राधान्य असेल, अशा शब्दात यशवंत डांगे यांनी प्राणी मित्र संघटनेला फटकारले.

# केडगाव रेणुका माता देवी मंदिर रस्त्यावरील खड्डे नवरात्रोत्सवाच्या आधी बुजवून डांबरीकरण करा



मनोज कोतकर

नगर - केडगाव येथील रेणुका माता देवी मंदिराकडे जाणारा रस्ता व मोहिनीनगर रस्ता सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून मोठमोठे खड्डे पडल्यामुळे भाविक भक्तांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. नवरात्र उत्सवाच्या अगोदर तरी या रस्त्यावरील खड्डे बुजवून डांबरीकरणाचा लेअर मारावा अथवा पॅचिंग करून द्यावे, अशी मागणी माजी सभापती मनोज कोतकर यांनी महानगरपालिकेकडे केली आहे.

रेणुका माता देवी हे केडगाव परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान असून नवसाला पावणारे धार्मिक ठिकाण आहे. नवरात्र उत्सव काळात जिल्हाभरातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येथे येतात. या काळात महिलावर्ग ९ दिवस उपवास पाळतात तसेच पायामध्ये चप्पल न घालता मंदिरापर्यंत पायी जातात. त्यामुळे खड्डेमय रस्त्यावरून चालताना त्यांना प्रचंड त्रास होतो. भाविकांची ही गैरसोय लक्षात घेऊन महापालिकेने तातडीने उपाययोजना करावी, केडगाव देवी मंदिर रस्त्यावरून भाविक भक्त दररोज देवदर्शनासाठी जात असतात. त्याना अडचण होऊ नये यासाठी. महापालिकेने रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून डांबरीकरणाचा लेअर करून दळणवळणाची व्यवस्था करावी, तसेच बांधकाम विभागाचे इंजि. सचिन चव्हाण यांनी रस्त्यावरील खड्ड्यांची पाहणी केली असल्याची माहिती मनोज कोतकर दिली आहे.

केडगाव उपनगरामध्ये कचरा समस्येचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत आहे. सध्या सणासुदीचे दिवस सुरू असून रस्त्यावर सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत आहेत. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. नवरात्र उत्सव जवळ आला असून केडगाव देवी रोडसह परिसरात कचऱ्याचे ढीग पडून राहिले आहेत. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा त्रास मोठ्या प्रमाणावर वाढला असून ते टोलक्याने नागरिकांवर हल्ले करत आहेत. दररोज घंटागाडीद्वारे नियमित कचरा संकलन करावे, तसेच मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करून त्यांना पकडण्यात यावे, अशी मागणी मनोज कोतकर यांनी आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केली आहे.

# नगर- पुणे महामार्गावर कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

नगर - भरधाव वेगात आलेल्या मारुती कंपनीच्या वॅगन आर कारने पुढे चाललेल्या मोटारसायकलला पाठीमागून जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकल वर पाठीमागे बसलेल्या महिलेचा मृत्यू झाला तर तिचे पती जखमी झाले. नगर - पुणे महामार्गावर पळवे (ता.पारनेर) शिवारात ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास ही घटना घडली. मुक्ता सर्जेराव झरेकर (वय ४५, रा. हिवरे झरे, ता.नगर)

याबाबत सर्जेराव दादाभाऊ झरेकर (वय ५२, रा. हिवरे झरे, ता.नगर) यांनी ४ सप्टेंबर रोजी सुपा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी सर्जेराव हे त्यांची पत्नी मयत मुक्ता यांच्या सोबत त्यांच्या हिरो कंपनीच्या एच एफ डिलक्स मोटारसायकल वर (क्र. एमएच १६ बी क्यु ४७४४) ३१ ऑगस्ट रोजी त्यांच्या मुलीला भेटायला गेले होते. तेथून नगर - पुणे रोडने परतत असताना सायंकाळी ७ च्या सुमारास पळवे गावच्या शिवारात संजीवनी हॉटेल समोर पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या मारुती कंपनीच्या वॅगन आर कारने (क्र.एम एच १२ डी एम ९६४७) त्यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली.

या धडकेत पाठीमागे बसलेल्या मुक्ता झरेकर या रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. अपघातात फिर्यादी सर्जेराव झरेकर हे ही जखमी झाले होते. त्यांनी दवाखान्यात उपचार घेतल्यानंतर आणि पत्नीचे अंत्यसंस्कार व इतर विधी केल्यानंतर ४ सप्टेंबर रोजी सुपा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून अज्ञात कार चालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तहसील कार्यालयाच्या अनागोंदी कारभारावर कारवाई करण्यासाठी १५ सप्टेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण करणार

**अवैध उत्खनन, वीटभट्ट्या, बेकायदेशीर वाहतूक व भ्रष्टाचार प्रकरणी कारवाई होत नसल्याचा आरोप**

नगर - अहिल्यानगर व पारनेर तहसील कार्यालयाच्या अनागोंदी कारभाराची अनेक वेळा तक्रार, उपोषण आणि आंदोलन करून देखील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दखल घेतली जात नसल्याने अन्याय निवारण निर्मूलन समितीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा दिला आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, १५ सप्टेंबर रोजी नाशिक येथे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येणार आहे.

पारनेर तालुक्यातील मौजे ढवळपुरी येथील १ जुलै २०२५ रोजी आदेश झाल्यानंतरही महसूल अधिनियम १९६६ चे कलम १७६ व १८२ नुसार पुढील कारवाई करण्यात आलेली नाही.

मौजे म्हसणे सुलतानपूर येथील अवैध मुरूम उत्खनन प्रकरणी ७२ लाख ४५ हजार रुपयांचा दंड उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा, पारनेर यांनी शासन परिपत्रकाचा चुकीचा वापर करून शासनाकडे जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी माफ केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये कारवाई करावी, अशी मागणी समितीने केली आहे.

पारनेर तालुक्यातील अनेक वीटभट्टी धारकांनी तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून कमी रॉयल्टी दाखवून मातीचा मोठा साठा करून ठेवला आहे. मात्र, याबाबत पंचनामा करून दंडात्मक कारवाई जाणीवपूर्वक टाळली जात असल्याचा आरोप समितीने केला आहे.

मौजे गटेवाडी येथील फॉरेस्ट खात्यातील जमीन सरपंच व ठेकेदारांच्या संगनमताने रस्त्याच्या कामासाठी वापरली गेली. रॉयल्टी व परवानगी नसतानाही तहसील कार्यालयाने यावर कारवाई केली नाही. बाबुर्डी बेंद ते घोसपुरी या मार्गावर नियमबाह्य दुहेरी वाहतूक सुरू असून महसूल अधिनियमाप्रमाणे कारवाई अद्याप करण्यात आलेली नाही.

श्रीगोंदा तालुक्यातील निबवी गावात नियमबाह्य कारभार सुरू असल्याने अनेक वेळा तक्रारी व उपोषण झाले; मात्र कोणतीही दखल घेतली गेली नाही. तसेच पारनेर तालुक्यातील मौजे भाळवणी येथील पेट्रोल पंपासमोर शेडमध्ये अवैध उत्खनन करून मुरुमाची भर टाकण्यात आली. याचा फेरपंचनामा सार्वजनिक बांधकाम विभागाने करून, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा नियम ४८ (७), ४८ (८) नुसार दंडात्मक कारवाई तसेच भादंवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या सर्व तक्रारींचा पाठपुरावा अनेक दिवसांपासून सुरू आहे. वारंवार निवेदने, उपोषण व आंदोलन करून देखील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कारवाई होत नसल्याने संघटनेच्या वतीने संताप व्यक्त केला जात आहे. कारवाईस टाळाटाळ होत असल्याने आता विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषणास बसणार आहोत, असा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.



भिंगारमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजेच्या तालावर नाचताना कार्यकर्ते. (छाया- बबलू शेख)

# भिंगारमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजेचा दणदणाट

## १४ मंडळांवर गुन्हे दाखल, रात्री ११ वाजता संपली मिरवणूक

नगर - भिंगार मध्ये ४ सप्टेंबर रोजी मोठ्या पोलिस बंदोबस्तात गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली, या मिरवणुकीत सहभागी झालेल्या १८ मंडळांपैकी १४ मंडळांनी डीजे चा दणदणाट केल्याने त्या मंडळांच्या अध्यक्षांसह डीजे मालकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी सर्व डीजे रात्री १० वाजता बंद केले आणि ११ वाजता गणेश मूर्तींचे विसर्जन होवून मिरवणूक संपली.

या मिरवणुकीसाठी २५ अधिकारी आणि १७० पोलिस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना अगोदरच नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. तर ४० जणांना भिंगार हद्दीतून एक दिवसासाठी हद्दपार करण्यात आले होते. सायंकाळी गणेश मंडळांच्या मिरवणुकीस प्रारंभ झाला. त्यात केवल ४ मंडळांनी पारंपारिक वाद्य लावली होती, तर १४ मंडळांनी डीजे चा दणदणाट केला. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्या अध्यक्षांवर व डीजे मालकांवर गुन्हे दाखल केले. मिरवणुकीला रात्री १० वाजेपर्यंत परवानगी देण्यात आलेली होती. त्यामुळे पोलिसांनी १० वाजता सर्व डीजे तसेच इतर वाद्ये बंद केली. तसेच मंडळांना गणेश मूर्तींचे विसर्जन करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर ११ वाजेपर्यंत सर्व मंडळांच्या गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

# खाजगी कंपनीने बेकायदेशीररित्या उभारला पोल्ट्री प्रकल्प; कारवाई करा अन्यथा आंदोलन

**अस्तगाव ग्रामस्थांची जिल्हाधिकारी, जि.प.सीईओंकडे मागणी**

नगर - पारनेर तालुक्यातील अस्तगाव गावच्या शिवारात खाजगी कंपनी पोल्ट्री व पोल्ट्री पूरक उद्योग हा प्रकल्प उभारत आहे. या प्रकल्पास सर्व गावकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. कारण या प्रकल्पामुळे निसर्गाचे वरदान लाभलेल्या अस्तगाव आणि आसपासच्या गावांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होवून गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. त्यामुळे या कंपनीला ग्रामपंचायतने ना हरकत नाकारली असूनही कंपनीकडून बेकायदेशीरपणे प्रकल्प उभारणी सुरूच आहे. याबाबत तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.

गावच्या सरपंच रेश्मा केशव काळे, उपसरपंच ईश्वर धर्मा पठारे, ग्रामपंचायत सदस्य संध्या कल्याण काळे, सुरेश गोरक्ष काळे, वैभव रावसाहेब काळे, सीमा प्रमोद काळे, अलका शिवाजी नाणेकर, जालिंदर दत्तात्रय काळे यांच्यासह ग्रामस्थांनी याबाबत जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रदूषण नियंत्रण कार्यालय, पोलीस अधिक्षक यांना निवेदन दिले आहे. यात म्हटले आहे की, ग्रामस्थांचा आणि ग्रामपंचायत सदस्यांचा विरोध असतानाही तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत सदस्यांना व ग्रामस्थांना विश्वासात न घेता १९ जून २०२४ च्या मासिक मिटिंगच्या इतिवृत्तात या कंपनीला ना हरकत देण्याचा ठराव घुसडून बेकायदेशीरपणे ना हरकत प्रमाणपत्र दिले. याची माहिती मिळताच ३१ जुलै २०२४ च्या मासिक मिटिंग मध्ये सर्व सदस्यांनी हा ठराव तहकूब करून याबाबत ग्रामसभेत निर्णय घेण्याचा ठराव केला.

१ ऑगस्ट २०२४ रोजी उपसरपंचासह ग्रामपंचायत सदस्यांनी पारनेर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना सदर ठराव विखंडीत करण्याचे पत्रही दिले. त्यानंतर लगेच तत्कालीन सरपंच लताबाई काळे यांच्यावर अविश्वास ठराव दाखल केला. तो ६ ऑगस्ट २०२४ रोजी मंजूरही झाला. त्यानंतर रेश्मा केशव काळे यांची सरपंच पदी निवड झाली. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत उर्जा कंपनीला दिलेली ना हरकत रद्द करण्याचा ठराव घेण्यात आला. तरीही कंपनीचे काम सुरुच असून याबाबत ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलिस प्रशासन यांना निवेदने दिली आहेत. मात्र याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही.

ग्रामपंचायतने कंपनीच्या बांधकामाची कुठलीही नोंद दप्तरी लावलेली नाही, तसेच या बांधकामास मासिक सभेने आणि ग्रामसभेने मंजुरी नाकारली असून सदर बांधकाम त्वरित थांबविण्यात यावे याबाबतची नोटीस घेवून ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ हे कंपनीच्या चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी गेले असता तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नोटीस घेतली नाही. त्यामुळे तेथे नोटीस डकविण्यात आली असता या मुजोर अधिकारी कर्मचाऱ्यांनी ती सर्वांसमोर फाडून टाकत खोटे गुन्हे दाखल करण्याची धमक्या दिल्या जात आहेत.

कंपनीच्या उभारलेल्या प्रकल्पावर आपल्या स्तरावरून तातडीने कायदेशीर कारवाई करून सदर प्रकल्प बंद करण्यात यावा अन्यथा आम्हा सर्व गावकऱ्यांना न्याय मागण्यासाठी लोकशाही मार्गाने आमरण उपोषण अथवा अन्य प्रकारचे तीव्र आंदोलन करावे लागेल. तरी आमच्यावर आंदोलनाची वेळ येवू न देता आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# शकुंतला चोपडा यांचे हृदयविकाराने निधन



नगर - घासगल्ली येथील रहिवासी शकुंतला चोपडा (खांबावाला, वय ८०) यांचे ५ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, २ मुले, १ मुलगी, सुन, दीर, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या झंकारमल चोपडा यांच्या पत्नी तर तुषार व शैलेश यांच्या मातोश्री तसेच अमृतलाल चोपडा यांच्या भावजय होत.

# सरुबाई शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - अरणगाव येथील रहिवाशी सरुबाई देवराम शिंदे (वय ७३) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अरणगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

अरणगावच्या उपसरपंच स्वाती शिंदे यांच्या सासू तर भाऊसाहेब शिंदे यांच्या त्या आई होत.



जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील ५१ शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

# शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा मंडळाचा उपक्रम कौतुकास्पद

### छायाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन; जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील ५१ शिक्षकांचा सत्कार

नगर – विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षकांना महत्त्व आहे. शिक्षकांनी केलेले संस्कार यामुळेच विद्यार्थ्यांचे भविष्य घडत असते. शिक्षकांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने दरवर्षी बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील शिक्षकांचा सत्कार करण्यात येतो. शाळेतील शिक्षक उत्तम प्रकारे ज्ञानदानाचे कार्य करीत असल्याने शाळेच्या गुणवत्तेत वाढ होत आहे. व शाळेचा नावलौकिकात भर पडत आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान असते. मंडळाने गेल्या अनेक वर्षापासून शिक्षक सत्काराची परंपरा कायम राखली आहे. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा मंडळाचा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन अ.ए. सोसायटीचे प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले आहे.

नवीपेठ येथील बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत शिक्षक दिनानिमित्त जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने शाळेतील ५१ शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सरस्वती देवी व डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांचे प्रतिमेचे पूजन छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत अध्यक्ष शैलेश मुनोत, मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया, पूर्व प्राथमिक वर्गाच्या इन्चार्ज वनिता चौधरी, वर्षा चिखले, मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, सत्येन मुथा, प्रकाश गांधी, अजय गांधी, बाबालाल गांधी, संजय ओस्तवाल, चेतन गुगळे, हेमंत मुथा, विनोद पुरोहित, गौरव मुनोत आदिंसह मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रास्ताविकात शैलेश मुनोत म्हणाले, गेल्या अनेक वर्षापासून मंडळाच्या वतीने शिक्षकांचा सत्कार केला जात आहे. या शाळेतील विद्यार्थी असल्याने बालपणाच्या आठवणींना उजाळा मिळतो. या शाळेत आल्यानंतर मनस्वी आनंद होत असतो. तसेच या शाळेतील शिक्षकांनी कष्ट करून अनेक विद्यार्थी घडविले आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर सन्मान करावा. विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे.

ज्योती सिसोदिया म्हणाले, मंडळाच्या वतीने दरवर्षी शिक्षकांचा सत्कार केला जात आहे. हा सत्कार शिक्षकांसाठी नेहमीच प्रेरणादायी आहे. मंडळाच्या वतीने नेहमीच सामाजिक,सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जात आहेत. ही कौतुकास्पद बाब आहे.

शाळेतील विद्यार्थी चिरंजीव सर्वम चोपडा याने शिक्षकांप्रती मनोगत व्यक्त केले. मंडळाच्या वतीने या विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन पूजा कराळे व कांतीलाल खुरंगे यांनी केले. आनंद मुथा यांनी आभार मानले.

# १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

नगर – अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेमार्फत १९ वर्षांच्या खालील खेळाडू म्हणजे १/१/२००६ नंतर जन्मलेले नगर जिल्ह्यातील खेळाडू साठी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केली आहे. नगर येथील गायत्री मंगल कार्यालय, महाजन गल्ली येथे स्पर्धेचे नियोजन केले असून ७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता स्पर्धेचे उद्घाटन केले जाईल. नांदेड येथे होणाऱ्या राज्य स्पर्धा साठी अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ या स्पर्धेतून निवडण्यात येणार आहे. अंतिम निकाल पत्रका प्रमाणे ४ मुले व ४ मुली, म्हणजेच प्रथम ४/४ खेळाडू राज्यस्तरावर पाठविण्यात येतील. अहिल्यानगर जिल्ह्यातून निवड झालेल्या खेळाडूंची राज्य निवड चाचणी स्पर्धेची प्रवेश फी, रू. १००० संघटनेमार्फत भरली जाईल व तेथे राहण्याची व्यवस्था सुद्धा केली जाईल. पहिल्या पाच खेळाडूंना (मुले व मुली) आकर्षक करंडक सुद्धा देऊन गौरविण्यात येणार आहे

स्पर्धा ९,११,१४,१७ व १९ वर्षा खालील मुले व मुली खेळाडूं साठी खुली असून खेळाडूंनी येताना बुद्धिबळ पट, सोंगट्या, जेवणाचा डबा व पिण्याचे पाणी आणावे. सर्व सहभागी खेळाडूंनी सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचा नुकताच क्रीडा सप्ताह झाला आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे व विशाल गर्जे यांनी असे जाहीर केले आहे की U9, U11, U14, U17 U19 या ग्रुपमधील पहिल्या पाच विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येतील. तसेच १९ वर्षाखालील गटात पहिल्या पाच खेळाडुंना जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने आकर्षक ट्रॉफी देण्यात येईल. हे खेळाडू अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व नांदेड येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेत करतील.

प्रवेश ऑनलाईन किंवा व्हॉट्स ॲपवर स्वीकारले जाणार आहेत.

स्पर्धा यशस्वी करण्याकरिता अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटना प्रयत्नशील असून अहिल्या नगर जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडूंनी उत्स्फुर्तपणे स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी केले आहे.

खालील गुगल फॉर्म भरून आपला प्रवेश निश्चित करा https://forms.gle/3tE1C8M1rj6PmRJG

१९ वर्षांखालील विजेत्या पाच मुली व पाच मुले यांना ट्रॉफी. ९,११,१४,१७ वर्षांखालील विजेत्या मुला मुलींना ५ मेडल्स.

निवड चाचणी स्पर्धेतील प्रवेश नोंदणी करता व माहितीकरिता यशवंत बापट ९३२६०९२५०१, पारूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८, देवेंद्र ढोकळे ८६००४१२६३३, प्रशांत धंगेकर ९९२१३७७९८८, मनीष जस्वानी ८८५५००२३३२, सनी गुगळे ८८८४४५५३३५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे अवाहन संघटनेने केले आहे.



माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

# माऊंट सिनायमध्ये शिक्षक दिन उत्साहात

नगर – सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून किनगाव जिल्हा लातूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर तर विशेष अतिथी म्हणून अहमदनगर महाविद्यालयतील सेवानिवृत्त प्राध्यापिका श्रद्धा ठाकूरदास व श्रीरामपूर येथील सेवानिवृत्त शिक्षिका सुनंदा प्रेमचंद शिंदे उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यालयाची हेड गर्ल अंजली वायकर हिने मुख्याध्यापिका म्हणून तर इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक- शिक्षिका म्हणून आजच्या दिवसाचे कामकाज पाहिले. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व शिक्षक शिक्षिका यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी भाषणे, नाटिका व समुह नृत्ये सादर करून शिक्षकांप्रती असणारी कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.वाडकर व प्रा. ठाकुरदास यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली वायकर व गायत्री चव्हाण यांनी केले तर साक्षी राठोड हिने पाहुण्यांच्या परीचय करून दिला. विद्यालयाचा हेड बॉय ईशांत आठरे याने आभार व्यक्त केले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका जयश्री खरात, प्रविण राजे शिंदे, संस्थापक डॉ. शाम खरात, सत्यशिल शिंदे उपस्थित होते.

# मदरसा कादरीया अंजुमन ए जमीयतुल कुरैशच्यावतीने सिरतुन्नबी क्विज कॉम्पिटिशन



मदरसा कादरीया अंजुमन ए जमीयतुल कुरैशच्यावतीने सिरतुन्नबी क्विज कॉम्पिटिशनमधील विजेत्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

नगर – १५०० वा जश्ने ईद मिलादुन्नबी (स.) निमित्त अहमदनगरमध्ये सिरतुनबी क्विझ कॉम्पिटिशन सिझन दोन २०२५ चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. पैगंबर हजरत मुहम्मद मुस्तफा (स.) यांच्या जीवनचरित्रावर आधारित प्रश्नोत्तर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी ज्ञान प्रदर्शित केले.

स्पर्धेत पहिला क्रमांक तहेरीन शकील कुरैशी (₹११०००), दुसरा क्रमांक उम्मे फायजा आसिम कुरैशी (₹७०००) आणि तिसरा क्रमांक नाजीया बुरहाण शेख (₹४०००) असे तीन बक्षीसे देण्यात आली. विजेत्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

ईद मिलादुन्नबी या पवित्र पर्वानिमित्त मदरसा कादरिया अंजुमन-ए-जमीयतुल कुरेश, अहमदनगर तसेच आला हजरत ताजुल फुहुल अक्॑डमी शाखा अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने पैगंबरांच्या जीवनावर आधारित क्विज कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रमुख पाहुणे व जज म्हणून पुणे येथील राहत अली कुरैशी, हाफीज जुलफेकार, हाफीज अनीस कुरैशी, ईमरान शेख आदी उपस्थित होते.

अल्लाहच्या रसूल यांचे जीवन संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श आहे. त्यांची सीरत म्हणजे अखंड मार्गदर्शनाचा प्रकाश आहे. या सिरतुनबी क्विझ स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी पैगंबर यांच्या जीवनाविषयी अधिक जाणून घेण्याचा प्रयत्न केला ही आनंदाची बाब आहे.

सर्वांनी पैगंबर यांच्या शिकवणीप्रमाणे आपले जीवन घडवावे, हेच या स्पर्धेचे खरे यश आहे, असे प्रतिपादन नालबंद मस्जिदचे पेशइमाम मौलाना मोहम्मद अदनान कादरी यांनी केले.

कार्यक्रमास विद्यार्थ्यांबरोबर पालक वर्गही उपस्थित होता.



डॉन बॉस्को विद्यालय येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# डॉन बॉस्को विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

नगर – डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जयंतीचे अवचित्य साधून डॉन बॉस्को माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळेस विद्यार्थ्यांनी सुंदर अशा लेझीमची लयबद्ध ताल आणि फुग्यांचा कमानीतून शिक्षकांचे स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी शाळेचे प्राचार्य फादर अजित मुनिस, रेक्टर फादर रिचर्ड डिसिल्वा, संस्थेचे व्यवस्थापक फादर म्यॉंवरॉन, फर्नांडिस इंग्रजी माध्यमाचे प्राचार्य फादर रिचर्ड बुरखाव, ब्रदर शेल्डन डायस, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शिल्पा निकाळजे मॅडम, फ्रान्सिस पाटोळे, डॉ. शितल कोतकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळेस शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी विद्यार्थ्यांनी सुंदर अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

यावेळेस सोनाली गरुड यांनी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण व मदर तेरेसा यांच्याविषयी माहिती दिली. तसेच शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनात असलेले महत्त्व समजावून सांगितले. पुढे बोलताना त्यांनी एक पुस्तक, एक पेन, एक विद्यार्थी आणि एक शिक्षक संपूर्ण जग बदलू शकतात असा मंत्र विद्यार्थ्यांना दिला.

यावेळेस विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे आभार मानण्यासाठी सन्मानपत्राचे वाचन करण्यात आले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे प्राचार्य फादर अजित मुनिस यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनानिमित्त मार्गदर्शन केले त्यात त्यांनी आयुष्यात असणारे अभ्यासाचे तसेच शिस्तीचे महत्व समजावून सांगितले.

# जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाच्यावतीने अहिल्यानगर जिल्ह्यात 'संपूर्ण जनजागृती अभियान'

### जिल्ह्यातील १०५ गावे, ३०५ शाळा आणि ७५ महाविद्यालयात उपक्रम राबविण्याचे नियोजन

नगर – सर्वसामान्य नागरिक, युवावर्ग, किशोरवयीन मुले-मुली, शहरी व ग्रामीण भागातील दुर्लक्षित गट, झोपडपट्टी तसेच अतिजोखीम गट असलेल्या भागांमध्ये एचआयव्ही एड्स बाबत जनजागृती होण्याकरिता जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर यांच्यामार्फत संपूर्ण जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमात सर्व एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र, संपूर्ण सुरक्षा केंद्र, सुरक्षा क्लिनिक, एआरटी केंद्र या ठिकाणच्या कर्मचारी सहभागी होणार असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव यांनी दिली आहे.

१२ ऑगस्ट ते १२ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १०५ गावे, ३०५ शाळा आणि ७५ महाविद्यालयात हा अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे. आत्तापर्यंत ५७ गावे, १०३ शाळा, २९ महाविद्यालय आणि २१ झोपडपट्टी परिसरात या अभियानांतर्गत उपक्रम राबविण्यात आले आहेत. ४७२ गृहभेट व १९ विषय शिबिरे घेण्यात आली आहेत.

गावपातळीवर नागरिकांच्या सभा घेऊन संवेदनशीलता निर्माण करणे, एच.आय.व्ही. एड्सविषयी जनजागृती करणे, विवाहापूर्वी युवक-युवतींची एच.आय.व्ही. तपासणी करणे, गावातील गरोदर स्त्रीयांची रुग्णालयात नोंदणी, लवकर तपासणी व निदान झाल्यास तात्काळ उपचार यावर भर दिला जात आहे. त्याचबरोबर मोफत एच.आय.व्ही. तपासणी व उपचार, सुरक्षित लैंगिक संबंध, कलंक व भेदभाव नष्ट करण्याबाबतही मार्गदर्शन केले जात आहे.

शाळा स्तरावर किशोरवयीन मुला-मुलींना एचआयव्ही-एड्सची मूलभूत माहिती दिली जात आहे. पौगंडावस्थेत होणारे शारीरिक, मानसिक व भावनिक बदल, व्यसनाचे दुष्परिणाम आणि एचआयव्ही प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत विद्यार्थ्यांना जागरूक केले जात आहे.



कुस्ती स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या श्री शाहू विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# श्री शाहू विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांची कुस्ती स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी


नगर – राहुरी तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे येथील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेत पाच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सर्वच विद्यार्थ्यांनी यश मिळवत आपल्या शाळेचा नावलौकिक वाढवला.

या स्पर्धेमध्ये आदित्य रावसाहेब थोरात (६२ किलो), आदित्य संतोष कल्हापुरे (८५ किलो) वजन गटामध्ये अंतिम सामने जिंकून यांची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. ओंकार जालिंदर गिर्हे यानेही ६६ किलो वजन गटामध्ये तृतीय क्रमांक मिळवला. रुद्र प्रशांत कारले व राजवीर नन्नवरे यांनीही अनुक्रमे १४ व १७ वर्षे वयोगटामध्ये समाधानकारक कामगिरी केली. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक आप्पासाहेब शिंदे, राहुल जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक रायते एम.डी.पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक शिंदे ए.आर तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सर्व विश्वस्त व सदस्य, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर सेवकवृंद यांनी अभिनंदन केले. तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत चमकदार कामगीरी केल्याबद्दल मुख्याध्यापक रायते एम.डी.पर्यवेक्षक शिंदे ए.आर यांनी खेळाडूंचा गौरव केला.

# जीवनाला योग्य दिशा देणारा शिक्षक

शिक्षक म्हणजे फक्त पुस्तकातील धडे शिकवणारी व्यक्ती नव्हे, तर तो आपल्या विद्यार्थ्यांचे जीवन ज्ञानाने आणि शहाणपणाने घडवतो.




शिक्षक, गुरु, शब्द बदलले तरी त्यांचा सार तोच राहतो. प्रत्येक भाषेत, प्रत्येक संस्कृतीत शिक्षकाचा अर्थ कालातीत आणि सार्वत्रिक आहे. शिक्षक म्हणजे फक्त ज्ञान देणारा नव्हे, तर जीवन घडवणारा, चारित्र्य निर्माण करणारा आणि पिढ्यानपिढ्या मार्ग दाखवणारा असतो. आपण हा शब्द कसाही परिभाषित केला तरी त्यातून प्रकटणारी भावना नेहमी आदर, कृतज्ञता आणि प्रेरणेचीच असते.

प्रत्येक विद्यार्थी शिक्षकासाठी सुरुवातीला अनोळखी असतो. प्रत्येक वर्षी नवीन चेहरे, नवे प्रश्न, नवी स्वप्नं घेऊन वर्गात प्रवेश होतो. तरीही खरा शिक्षिक आपल्या प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्याच घरातील मुलाप्रमाणे सामावून घेतो, प्रेमाने, काळजीने आणि नि:स्वार्थ समर्पणाने. नात्याचा बंध नसतानाही शिक्षक शुद्धतम अशी भेट देतो ती ज्ञानाची आणि हे ज्ञान पैशासारखं कधीही कमी होत नाही, कधीही नष्ट होत नाही, उलट ते जीवनभराची सर्वात मोठी संपत्ती ठरते.

आज कितीही प्रगत तंत्रज्ञान असलं तरी एकेकाळी फळ्यावर खडूने लिहिलेला धडा कधीही बदलता येणार नाही. डिजिटल युगाच्या खूप आधी शिक्षक फक्त आपला आवाज, आपली निष्ठा आणि आपलं मन घेऊन ज्ञान देत होते. तंत्रज्ञान हे फक्त साधन आहे, पण शिक्षक हा मनुष्य असून तो अनंत प्रेमाने आणि उद्देशाने ज्ञान देतो. मग तो शाळेतील शिक्षक असो, महाविद्यालयातील प्राध्यापक असो किंवा आपले पालक असोत. त्यांचा प्रभाव कोणत्याही स्क्रीन किंवा सॉफ्टवेअरपेक्षा खूप मोठा असतो.

शिक्षक दिनी आपण भारताचे माजी राष्ट्रपती, तत्त्वज्ञानी आणि महान शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन साजरा करतो. शिक्षक निःस्वार्थपणे वर्षानुवर्षे मनं घडवतो, भविष्य घडवतो. विद्यार्थी म्हणून आपली जबाबदारी आहे की आपण त्यांना केवळ या दिवशीच नव्हे तर रोजच महत्त्व दिलं पाहिजे. महागड्या भेटी देऊन नव्हे, तर त्यांच्या मनाला प्रिय असलेल्या साध्या गोष्टींनी. आपल्या आदराने, कृतज्ञतेने आणि प्रेमाने. हीच त्यांच्या प्रती खरी कृतज्ञता आहे.

माझा प्रवास किंडर किड स्कूल पासून सेंट मायकेल्स स्कूल, सॅक्रेड हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूल, एस आर ई एफ कॉलेज, अपप्राईज ट्युटोरियल्स, नगर कॉलेज, आणि आता आय एम एस कॉलेज असा झाला आहे. या प्रत्येक टप्प्यावर माझे जीवन अनेक शिक्षकांच्या मार्गदर्शनाने उजळले. प्रत्येक शिक्षक आणि अगदी शिक्षकेतर कर्मचारीसुद्धा माझा मार्ग उजळवण्यात सहभागी झाले. त्यांच्या मुळेच मी आज अधिक आत्मविश्वासी, प्रेरित आणि कृतज्ञ आहे. त्यांनी मला फक्त ज्ञानच नाही तर धैर्य आणि दिशा दिली. त्यांच्या उदाहरणामुळेच मला एक दिवस शिक्षक होण्याचं स्वप्न आहे, कारण ज्ञानाची देणगी हीच जगाला दिलेली सर्वात मोठी भेट आहे.

पण आजच्या काळात शिक्षक आणि प्राध्यापकांना मिळणारा मान सन्मान पूर्वीइतकी राहिलेली नाही ही खंत आहे. तरीही हे नेहमी लक्षात ठेवलं पाहिजे की शिक्षकांचा आदर करणे हे सर्वात महत्त्वाचे आहे, कारण आपण आयुष्यात जे काही होतो ते त्यांच्या मार्गदर्शनामुळेच शक्य होतं. प्राचीन काळापासून 'गुरु' या शब्दाचा गाढा अर्थ आहे. जो अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखवतो. त्याचप्रमाणे शिक्षक आपले विद्यार्थी अनुभव आणि शहाणपणाने उजळवतात. आजच्या पिढीने शिक्षकांचं खरं मूल्य समजलं पाहिजे, कारण ज्ञान हीच सर्वोच्च शक्ती आहे, आणि शिक्षकाचा अनुभव कोणत्याही तंत्रज्ञानाने किंवा शॉर्टकटने बदलता येत नाही.

आज आपण कल्पनाही करू शकत नाही की किती विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोठं यश मिळवलं आहे. डॉक्टर, अभियंते, प्राध्यापक, उद्योजक आणि नेते म्हणून जगभर नाव कमावलं आहे. प्रत्येक अशा यशकथेच्या मागे वर्गखोलीत बसवलेल्या स्वप्नांना साकारणारा शिक्षक असतो. एकाच छताखाली असंख्य विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देत शिक्षक विविध व्यक्तिमत्त्वं घडवतो आणि असं करताना तो केवळ व्यक्तींचे जीवनच नव्हे, तर समाज आणि संपूर्ण जग बदलतो.

ज्ञानदीपः गुरुः  गुरु म्हणजे ज्ञानाचा दीप.

– **सिद्धी प्रमोद गांधी,** एमबीए २, आय एम एस अहिल्यानगर

# नवोदित व युवा कवींना दिलेल्या प्रोत्साहनामुळे त्यांचे काव्य अधिक सशक्त होईल

## प्रा.डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे यांचे प्रतिपादन; युवा साहित्य व नाट्य संमेलनांतर्गत झालेल्या काव्य वाचन स्पर्धेस कवींचा प्रतिसाद



युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या काव्य वाचन स्पर्धेचे उद्घाटन करताना न्यू आर्ट्‌स कॉमर्स महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिल आठरे.

नगर – कविता आपल्या आतील आवाज असून अस्तीवाची ओळख असते. कविता संकृतीची ओळख व इतिहासाची साक्षिदार व वर्तमानाची सादही असते. अनेक संत, पंत व तंत यांच्या रचनांच्या माध्यमातून कवित्व आपल्या समोर आले आहे. आजच्या आधुनिक काळातही कविता माणसाच्या जिभेवर रेंगाळताना दिसते. आता ती पुस्तकात बंदिस्त राहिलेली नसून वेगवेगळ्या समाज माध्यमांवरही अधिराज्य गाजवत आहे. नवोदित कवी सहज, साध्या, सोप्या व प्रभावी भाषेत यमक व मुक्तछंदाने सामाजिक आशय मांडत असल्याने अत्यंत वेगाने या कविता पसरत आहेत. युवा व नवोदित कवींना संधी देत व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मसापच्या सावेडी उपनगर शाखेचा उपक्रम कौतुकास्पद आहे. त्यामुळे त्यांचे काव्य अधिक सशक्त होईल, असे प्रतिपादन न्यू आर्ट्‌स कॉमर्स महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सावेडी उपनगर शाखा व न्यू आर्ट्‌स कॉमर्स महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर शहरात होणाऱ्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या काव्य वाचन स्पर्धेचे उद्घाटन न्यू आर्ट्‌स कॉमर्स महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिल आठरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.लक्ष्मिकांत येळवंडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी संमेलनाचे निमंत्रक व सावेडी उपनगर शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलूलकर, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, नंदकिशोर आढाव, स्पर्धा प्रमुख प्रा.गणेश भगत, परिक्षक प्रा.डॉ.मच्छिंद्र मालुंजकर, कवियत्री सायली देशपांडे आदी उपस्थित होते. या काव्य वाचन स्पर्धेस राज्यातील विविध जिल्ह्यातील ८४ नवोदित व युवा कवींनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

उपप्राचार्य डॉ.अनिल आठरे म्हणाले, कविता, नाट्य, लोकनाट्य हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यमे आहेत. चांगला समाज घडण्यासाठी यांचा फायदा होत आहे. व न्यू आर्ट्‌स कॉमर्स महाविद्यालयात होणारे साहित्य संमेलनामुळे महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या संमेलनात होणाऱ्या भरगच्च कार्यक्रमांचा आस्वाद सावांनी घ्यावा, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात जयंत येलूलकर म्हणाले, नगर मध्ये होणारे युवा साहित्य व नाट्य संमेलांच्या उपक्रमांची सुरवात काव्य वाचन स्पर्धेने आज झाली आहे. या पहिल्याच उपक्रमाला राज्यातून उत्स्फूर्त प्रत्रीसाद मिळाला आहे. असेच विविध उपक्रमांचे आयोजन येत्या ८ ते १० दिवसांमध्ये होणार आहे. या सर्व उपक्रमांना नागरिकांनी उपस्थित रहावे.

यावेळी कवी चान्द्रकांत पालवे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गणेश भगत यांनी केले. प्रा.नवनाथ येठेकर यांनी आभार मानले. स्पर्धेतील विजेत्यांना साहित्य संमेलनात कविता सादर करण्याची संधी मिळणार असून तेव्हाच पारितोषिकेही देण्यात येणार आहेत.

# 'आंतरराष्ट्रीय शांतता दिना' निमित्त रोटरी क्लबतर्फे 'शांतता रील' स्पर्धा

नगर – येथील 'रोटरी क्लब ऑफ अ.नगर' ने 'आंतरराष्ट्रीय शांतता दिनाच्या' निमित्ताने 'शांतता रील स्पर्धेचे' आयोजन केले आहे. रोटरी प्रांत ३१३२ च्या शांतता कमिटीच्या संचालक डॉ. सुधा कांकरिया यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली असुन, सामाजिक एकतेतून विश्वशांतीकडे, सामाजिक एकता से विश्वशांती की ओर आणि From Social Unity Towards World Peace या विषयावरील रील्स अपेक्षित आहेत, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष रो. सुभाष गर्जे यांनी दिली.

सदर रील ५५ सेकंदाचे असुन, मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील स्विकारले जातील. त्याचे नियम व अटी जाणुन घेऊन खालीलप्रमाणे अपेक्षित आहे:

(१) फक्त मूळ कंटेंट असावा, साहित्यिक चोरी असू नये., (२) आक्षेपार्ह किंवा अपमानास्पद भाषा वापरू नये., (३) व्हिडीओची लांबी कमाल ६० सेकंदापर्यंतच असावी. (४) व्यक्तिगत सहभाग किंवा जास्तीत जास्त ३ जणांच्या गटास परवानगी आहे., (५) एकाच भाषेचा वापर करावा. मराठी / इंग्रजी/ हिंदी., (६) प्रत्येक स्पर्धकाने फक्त एकच प्रवेशिका (Entry) द्यावी. दुसरी एन्ट्री दिल्यास अपात्र ठरवले जाईल., (७) रील व्हिडीओ उभ्या (Vertical) स्वरूपातच चित्रित केला गेला पाहिजे (रील फॉरमॅटप्रमाणे)., (८) फाईल आकार जास्तीत जास्त १०० एमबी, एम पी ४ फॉरमॅटला प्राधान्य.

रिल पाठविण्याची अंतिम तारीख : १४ सप्टेंबर संध्याकाळी ७ वाजे पर्यंत.रील पाठविण्यासाठी संपर्क करा: १. क्लबचे सचिव रो. संदीप ठोंबे ७९७२२४४६५९ आणि २. स्पर्धेचे आयोजक रो. रविंद्र राऊत ९७६३७१५७२१.

सध्याचे जीवन धावपळीचे व अनेक प्रकारच्या चिंता आणि भयाने ग्रासलेले दिसत आहे. तंटा, भांडणे, वादविवाद वाढत चालले आहेत. यातून अस्थिरता व अशांतता निर्माण झाली आहे. या सर्व दुषित वातावरणातून बाहेर पडून आपल्याला परत शांतीकडे वाटचाल करायची आहे. यासाठी सदर स्पर्धेच्या माध्यमातुन तरूण पिढीच्या विचारांना चालना मिळेल व शांती प्रस्थापित करण्यासाठी त्यांचा सहभाग वाढेल, अशी अपेक्षा डॉ. सुधाजी कांकरिया यांनी व्यक्त केली आहे.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी क्लबचे अन्य सदस्य रो. पुरूषोत्तम जाधव, रो. डॉ. दादासाहेब करंजूले, रो. डॉ. प्रकाश कांकरिया, रो. नितिन थाडे, रो. निलेश वैकर, रो. दिपक गुजराथी, रो. माधवराव देशमुख, रो. साधना देशमुख, रो. हर्षवर्धन सोनवणे, रो. प्रिती सोनवणे, रो. अनघा राऊत परिश्रम घेत आहेत.



शहरातील ज्योतिषी विजयकुमार कुलकर्णी यांना पुणे व जयपूर येथे झालेल्या ज्योतिष संमेलनात विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# राष्ट्रीय ज्योतिष संमेलनात अहिल्यानगरचे विजयकुमार कुलकर्णी यांचा पुरस्काराने गौरव

नगर – शहरातील ज्योतिषी विजयकुमार कुलकर्णी यांना पुणे व जयपूर येथे झालेल्या ज्योतिष संमेलनात विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथे अखिल भारतीय ज्योतिष संमेलनात देशभरातील ज्योतिषाचार्य सहभागी झाले होते. त्याचबरोबर जयपूर येथे इंटरनॅशनल ॲस्ट्रॉलॉजी रिसर्च सेंटर यांच्या वतीने आयोजित वेदामृत स्ट्रो, वास्तू आणि तंत्र संमेलन उत्साहात पार पडले.

या दोन संमेलनात विजयकुमार कुलकर्णी यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

# अशोकभाऊ फिरोदिया स्कूलमध्ये संवत्सरी उत्सव साजरा



संवत्सरी उत्सवामध्ये सहभागी झालेले अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी.

नगर – शांतता, समता आणि बंधुत्वाचा संदेश देणारा संवत्सरी उत्सव अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उत्साहात आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला. प्राथमिक तसेच माध्यमिक विभागात वेगवेगळे कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना सणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. संवत्सरी उत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी क्षमायाचना, आत्मसंयम आणि बंधुत्वाचा संदेश घेतला.

प्राथमिक विभागाच्या वतीने दुपारच्या सत्रात झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे सदस्य अभय रसिक लुनिया यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून रीना अभय लुनिया उपस्थित होत्या. या वेळी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, स्कूल कमिटी सदस्य शैलेश मुनोत, शाळेचे प्राचार्य प्रभाकर भाबड, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, प्राथमिक विभाग प्रमुख रेखा शर्मा, उपप्राचार्या कविता सुरतवाला तसेच शाळेतील शिक्षक–विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. सुवर्णा मलमकर व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाली.

पाहुण्यांचा परिचय सॅम्युअल–शिंदे यांनी करून दिला. विद्यार्थिनी अनुजा धसाळ, सावी गुगळे आणि मल्हार जाधव यांनी वेगवेगळ्या भाषेत संवत्सरी उत्सवाची माहिती दिली. पर्युषण पर्वात उपवास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी छायाताई फिरोदिया यांनी क्षमापन हे जीवनातील सर्वांत मोठे सामर्थ्य आहे, विद्यार्थ्यांनी ते आचरणात आणून स्वतःमध्ये संस्कार रुजवावेत, असे आवाहन केले.

अभय लुनिया म्हणाले की, लहान वयात तीन, पाच, आठ दिवस उपवास करणारे विद्यार्थी हे संस्कृती जपण्याचे मोठे उदाहरण आहे. यामुळे भावी पिढी संस्कारित होईल. तसेच उपवासामुळे आरोग्य सुधारते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी बाहेरचे खाणे टाळण्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य आणि नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या सादरीकरणासाठी स्मिता गांधी, आदिती कोकाटे आणि भक्ती थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती सावरीकर यांनी केले.

माध्यमिक विभागाचा कार्यक्रम सकाळच्या सत्रात रंगला. अध्यक्षस्थान गुरु आनंद विहार सेवा मंडळाचे संस्थापक समीर प्रकाश बोरा यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सोनाली समीर बोरा उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात नवकार मंत्राने झाली. पाहुण्यांचा परिचय अक्षरा गांधी हिने करून दिला. यावेळी विद्यार्थिनी सिद्धी दगडे, मोक्षा कटारिया आणि संयमी गुगळे यांनी भाषणातून संवत्सरी उत्सव व उपवासाचे महत्त्व स्पष्ट केले. उपवास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

समीर बोरा म्हणाले, पर्युषण पर्वातील उपवासाची परंपरा २६०० वर्षांपूर्वीपासून चालत आली आहे. अशा निर्जळी उपवासामुळे शारीरिक व मानसिक शुद्धी होते, तसेच कॅन्सरसारखे आजारही दूर ठेवता येतात. उपवासाचे फायदे आयुष्य निरोगी आणि संतुलित करत असल्याचे ते म्हणाले. माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनीही संवत्सरी उत्सवावर आधारित नृत्य–नाटिका सादर करून वातावरण रंगवले. या विद्यार्थ्यांना प्रिया भलगट, रेखा शर्मा, भारती हिंगे आणि सौ. अफसर शेख यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी समृद्धी नमन व मारिया तांबटकर यांनी केले. राजनंदिनी त्र्यंबके हिने आभार मानले.

# खेळामुळे तंदुरुस्ती व खरा आनंद मिळतो

## पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन



राज्यस्तरीय वरिष्ठ कॉर्फबॉल स्पर्धेत नगरच्या संघाला तृतीय क्रमांक मिळाला. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात पद्मश्री पोपटराव पवार यांनी खेळाडूंचा पदक व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

नगर – आरोग्यदायी जीवन आणि निखळ आनंदासाठी खेळायला पाहिजे. मैदानावर दररोज किमान एक तास घालवला पाहिजे. आमच्या कॉर्फबॉलच्या खेळाडूंनी अल्पावधीतच राज्य स्तरावर मिळवलेले यश कौतुकास्पद असून त्यांचे अभिनंदन करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे, असे गौरवोद्‌गार पद्मश्री पोपटराव पवार यांनी काढले.

राज्यस्तरीय वरिष्ठ कॉर्फबॉल स्पर्धेत नगरच्या संघाला तृतीय क्रमांक मिळाला. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात कॉर्फबॉल असोसिएशनचे अध्यक्ष या नात्याने पद्मश्री पोपटराव पवार बोलत होते. यावेळी खेळाडूंचा पदक व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. खेळाडूंना निरंतर सराव, मेहनतीचा सल्ला देऊन स्वतःच्या कॉलेज जीवनातील खेळाचा आढावा घेतला.

प्रास्ताविक असोसिएशनचे सचिव किशोर गांधी यांनी केले.

उपाध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया यांनी प्रसन्नता व्यक्त करताना सांगितले की, खेळाडूंनी मोठी कामगिरी केली आहे. प्रथमच राज्य स्तरावर स्पर्धेत सहभागी होऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. या खेळाडूंचा अभिमान वाटतो. त्यांना असोसिएशनच्या माध्यमातून कायम प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न राहील. साई सूर्य नेत्रसेवा यांच्या तर्फे खेळाडूंना जर्सी व सॅक भेट देण्यात आली. यावेळी असोसिएशनचे ट्रेझरर सी.ए. अजय गांधी, हिंद सेवा मंडळाचे अजित बोरा, हर्षल सेलोत उपस्थित होते.

नाशिकच्या मीनाताई ठाकरे क्रीडा संकुलात झालेल्या या राज्यस्तरीय बाद फेरी स्पर्धेत १८ जिल्ह्यातील संघ सहभागी झाले होते. दिशान गांधी याच्या नेतृत्वाखाली नगर संघाने पुणे शहर, सातारा, धुळे, नाशिक यांचा पराभव केला. नगरच्या संघात दिशान गांधी, कमलेश देवळालीकर, स्तवन प्रभू, सुहास चव्हाण, आदित्य मरकड, सिद्धार्थ हुशारे, पियुष चाबुकस्वार, हर्षवर्धन बोरूडे, अक्षय सारवन, मुली – पलक राठोड, साजरी परदेशी, मंजुश्री पालदिया, भक्ती परदेशी, ऋतुजा बोरा, प्राची काळे यांचा समावेश होता.



रंग दे बसंती या आंतरशालेय स्पर्धेत नालंदा स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. याबद्दल मुख्याध्यापिका हैदर डिसूजा व गौतम बहादुर्गे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचा सन्मान केला. (छाया – समीर मन्यार)

# रंग दे बसंती आंतरशालेय स्पर्धेत नालंदाचे विद्यार्थ्यांचे सुयश

नगर – अहिल्यानगर येथे रंग दे बसंती ह्या आंतरशालेय स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये शहरातील इंग्लिश मिडीयम शाळेमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये सोलापूर रोड वरील नालंदा स्कूलच्या १२ विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभाग घेतला होता.१२ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून याबद्दल मुख्याध्यापिका हैदर डिसूजा व गौतम बहादुर्गे यांनी कौतुक करून त्यांचा सन्मान केला.

नालंदा शाळेने स्पर्धेसाठी पालकातील समन्वय हा नवा उपक्रम राबवला असून अनेक शाळा अनेकदा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेल्या स्पर्धेबाबत पालकांशी मोजका संवाद साधतात. त्यांना पालकांच्या हस्तक्षेपाची भीती असते. तसेच काही पालकांना शालेय शिक्षण व्यवस्था स्पर्धा आयोजक व त्यांनी अधोरेखित केलेल्या मर्यादांबद्दल समज नसते.

शाळेने २०२५ मध्ये पालकांच्या सहभागाचा एक आगळावेगळा नवीन उपक्रम सुरू केला आणि वर्षातील पहिल्याच रंग दे बसंती झालेल्या आंतरशालेय स्पर्धेमध्ये त्यांचे सकारात्मक परिणाम दिसून आला.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आयोजकांनी फार कमी वेळ दिला होता. कमी वेळेत विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवले. १२ स्पर्धकांनी प्रत्येकी १ बक्षिस मिळवत शाळेचे नाव मोठे केले.



# जैन वात्सल्य संस्थातर्फे गरजूंना किराणा व अन्नधान्य वाटप

जैन ओसवाल वात्सल्य संस्थेमार्फत गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा व अन्नधान्य वाटप ॲड. विकी दिलिप मुथा यांच्या हस्ते करण्यात आले. धार्मिक परीक्षा बोर्ड समोरील अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, सचिन चोपडा, अशोक कोठारी, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ईश्वर बोरा आदी उपस्थित होते.

# अर्चक पुरोहित सेवा शिबिराचे ७ सप्टेंबर रोजी आयोजन

नगर – विश्व हिंदू परिषदेचे मंदिर एवं अर्चक– पुरोहित संपर्क आयामाचे वतीने अर्चक पुरोहित सेवा शिबिराचे आयोजन ७ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ६ पर्यंत सारडा कॉलेज येथे करण्यात आले आहे. यामध्ये शासनातर्फे दिले जाणारे ई–श्रम कार्ड बद्दल माहिती व प्रक्रिया, आरोग्य तपासणी, आयुष्मान भारत कार्ड दिले जाणार आहे.

या शिबिरासाठी मंदिराच्या अर्चक व पुरोहितांनी उपस्थित राहवे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहिती व संपर्कासाठी श्रीकांत नांदापूरकर मो.७०२०७५४७६१, गजेंद्र सोनवणे मो. ९४२२७ २७७२६ यांच्याशी संपर्क साधावा.

# गणपती विसर्जन : भक्तिभाव, उत्साह आणि जीवनतत्त्वांचा महोत्सव

भारतीय संस्कृती ही अनेक सण – उत्सवांनी समृद्ध आहे. प्रत्येक सणामागे एक कथा, एक श्रद्धा आणि एक जीवनमूल्य दडलेले असते. त्यात गणेशोत्सवाला एक वेगळीच लोकप्रियता आहे. घराघरात,विविध कार्यालयांमध्ये, सार्वजनिक मंडळांमध्ये गणेशाचे आगमन झाले की वातावरण मंगलमय होते. दहा दिवस भक्तिभाव, भजन – कीर्तन, पूजन – अर्चन, सामाजिक उपक्रमांनी गणेशोत्सव फुलत राहतो. आणि या दहा दिवसांच्या अखेरीस गणपती बाप्पाला निरोप देण्याचा भावपूर्ण क्षण म्हणजेच गणपती विसर्जन. हा क्षण भक्तांच्या मनात उत्साह, जल्लोष आणि थोडासा विरहही घेऊन येतो.

**विसर्जनाचा जल्लोष आणि भक्तिभाव :** गणपती विसर्जन हा केवळ धार्मिक विधी नाही तर सामूहिकतेचा एक अनोखा उत्सव आहे. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, गणपती चालले गावाला, चैन पडेना जीवाला, एक,दोन,तीन, चार, गणपतीचा जयजयकार अशा गजराने आकाश दुमदुमून जाते. ढोल–ताशांचा गजर, लेझीमचा ताल, टाळ–मृदंगाचा नाद आणि रंगीबेरंगी सजवलेल्या रथांमुळे वातावरण भारावून जाते. विसर्जन मिरवणुकीत लहानांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांचा सहभाग दिसून येतो. स्त्री–पुरुष, मुले–मुली, वेगवेगळ्या समाजघटकांतील लोक एकत्र येऊन सामूहिकतेची ताकद दाखवतात. हेच गणपती विसर्जनाचे वैशिष्ट्य आहे.

**जीवनतत्त्व सांगणारा संदेश :** गणपती विसर्जन आपल्याला एक गहन तत्त्वज्ञान शिकवते. मातीपासून साकारलेली गणेशमूर्ती पुन्हा पाण्यात विलीन होते. यातून एक संदेश मिळतो की ज्यापासून आलो, त्यातच विलीन व्हायचे. हे जीवनातील अनित्यत्वाचे प्रतीक आहे. प्रत्येक सुरुवात एका शेवटाशी जोडलेली असते आणि प्रत्येक शेवटात नव्या सुरुवातीची बीजे दडलेली असतात. म्हणूनच बाप्पाला निरोप देताना भक्त विरहाने ओथंबून जातात, तरीही पुढच्या वर्षी त्यांच्या आगमनाची आतुरता मनात बाळगतात.

**पर्यावरणपूरक विसर्जनाची गरज :** आजच्या काळात गणेश विसर्जनाला एक नवी दिशा मिळाली आहे – ती म्हणजे पर्यावरणपूरकतेची. नदी–नाले, विहीरी, तलावांचे प्रदूषण टाळण्यासाठी शाडूच्या मूर्ती, नैसर्गिक रंग, कृत्रिम विसर्जन तलाव किंवा कुंडांचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला आहे. पर्यावरणपूरक विसर्जनामुळे श्रद्धा आणि निसर्गसंवर्धन यांचा सुंदर समन्वय साधला जातो. अनेक ठिकाणी विसर्जनासोबत वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा,आरोग्य विषयक मोहीमा राबवल्या जातात. अशा उपक्रमांमुळे गणेशोत्सव अधिक अर्थपूर्ण आणि समाजाभिमुख ठरतो.

**सामाजिक ऐक्याचे प्रतीक :** गणपती विसर्जन हा एकात्मतेचा सण आहे. विसर्जनाच्या मिरवणुकीत समाजातील विविध घटकांचा सहभाग दिसतो. एकमेकांना मदत करणे, शिस्तबद्धतेने मिरवणूक पार पाडणे, समाजासाठी काम करणे हे सर्व ऐक्याचे दर्शन घडवते. वेगवेगळ्या धर्म, जाती, वयोगटातील लोक यात सहभागी होतात. त्यामुळे हा उत्सव फक्त धार्मिक न राहता सामाजिक व सांस्कृतिक समरसतेचे प्रतिक ठरतो.

**निरोपातून उगवणारी नवी आशा :** गणपती विसर्जनाचा क्षण म्हणजे केवळ निरोप नव्हे. तो क्षण म्हणजे नवी आशा, नव्या संकल्पांची चाहूल. बाप्पाला निरोप देताना प्रत्येक भक्त मनोमन ठरवतो की पुढच्या वर्षी अधिक भक्तिभाव, अधिक आनंदाने आणि अधिक जबाबदारीने त्यांचे स्वागत करायचे. अशा भावनांमुळे हा निरोप विरहाचा नसून नव्या सुरुवातीचा साक्षात्कार ठरतो.

**उपसंहार :** गणपती विसर्जन हा उत्सव भक्तिभाव, उत्साह, पर्यावरणपूरकता आणि सामाजिक ऐक्याचा अनोखा संगम आहे. तो जीवनातील अनित्यत्वाचा बोध करून देतो, पर्यावरणाशी नाते जपण्याची जाणीव करून देतो आणि समाजात एकोपा निर्माण करतो. म्हणूनच गणेश विसर्जन हा केवळ धार्मिक विधी नसून जीवनाला दिशा देणारा आणि समाजाला प्रेरणा देणारा महोत्सव आहे.

गणेश विसर्जन हा केवळ निरोपाचा क्षण नाही, तर जीवनातील अनित्यत्व, नवी आशा आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश आहे.

**– संदीप बांगर (शिक्षक), ९६५७२२३३११**
**श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे, ता. राहुरी जि.अहिल्यानगर.**

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## शेती करणाऱ्या कैद्यांचे कारागृह





कारागृह म्हटले तर साधारणपणे आपल्यासमोर येते कठोर बंदिस्त भिंती, तारेचे कुंपण, बंद केलेली जागा, खराब जेवण आणि तेथील कैद्यांची जीवनशैली. परंतु, असे एक कारागृह आहे जिथे हे असे काहीच नाही. उलट याठिकाणी कैदी सर्वसामान्य माणसांप्रमाणे राहतात. जिथे कैद्यांना मोकळे वातावरण मिळते, तिथे कैदी फक्त सुधारले जात नाहीत, तर ते आत्मनिर्भर होण्यासाठीही मार्गक्रमण करतात.

या कारागृहात रोज सकाळी सूर्य उगवल्यानंतर कैदी त्यांच्या रोजच्या कामांमध्ये गुंततात. या जेलची पाच एकर जमीन असून, इथे कैदी शेतात कष्ट करतात, मातीत घाम गाळतात, बीज पेरतात, भाज्या वाढवतात. मटर, कारलं, भेंडी, वांगीसारख्या विविध भाज्या त्या जमिनीवर पिकवल्या जातात. हे सर्व करताना त्यांच्या डोळ्यांत आत्मसन्मानाचा भाव दिसतो.

हे केरळमधील तिरुवनंतपुरम जिल्ह्यात असलेले नेट्टकाल्थेरी खुला कारागृह हे राज्यातील शिवाय देशातील पहिले असे कारागृह आहे, जिथे कैद्यांना सुधारण्यासाठी आणि आत्मनिर्भर होण्यासाठी विशेष संधी दिली जाते. ८ ऑगस्ट १९६२ रोजी स्थापन झालेल्या या कारागृहाचे क्षेत्रफळ तब्बल ४७२ एकर असून, येथे सध्या ३६७ कैदी वास्तव्य करतात. हे कारागृह एक साधे कारागृह नाही. इथे कैद्यांच्या पुनर्वसनासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणण्यासाठी विविध सुधारणा योजना राबवतात. शारीरिक श्रमासोबतच, मानसिक आरोग्यावरही इथे विशेष लक्ष दिले जाते. कैद्यांना संगणक शिक्षण दिले जाते, वाचनालयात नियमित वाचनासाठी प्रेरित केले जाते आणि योग, ध्यानासारख्या उपक्रमांद्वारे मानसिक शांतता प्राप्त करण्याची संधी दिली जाते. या सर्व गोष्टींनी हे कारागृह विशेष बनवले आहे. कैद्यांच्या मेहनतीने तयार होणाऱ्या उत्पादनांमुळे, कारागृहाला आर्थिक फायदा होत आहे. २०१८ मध्ये, इथल्या शेती उत्पादनांमधून तब्बल दीड कोटी रुपयांची विक्री झाली होती. इथल्या विविध उपक्रमांमुळे कैद्यांच्या जीवनात बदल घडतो आहे आणि ते समाजात पुनर्वसनासाठी सक्षम होत आहेत. ◆◆◆

## सॉरी शब्दाचा अर्थ काय?




आपल्याकडून कळत नकळत काही चूक झाली तर लगेचच दुसऱ्याला सॉरी म्हणून टाकतो. माफ करा या ऐवजी सॉरी हा शब्द अनेकांच्या अंगवळणी पडलेला आहे. पण सॉरी या शब्दाचा फुलफॉर्म किंवा याचा नेमका अर्थ हा अनेकांना माहीत नसतो.

तुम्हाला असं वाटतं असेल की सॉरी या शब्दाचा अर्थ म्हणजे मला माफ करा, माफी असावी असा असेल, पण तसं अजिबात नाही. सॉरी हा शब्दसारिग किंवा सॉरी या इंग्रजी शब्दापासून बनला आहे असं म्हटलं जातं. सॉरी किंवा सारिग या शब्दाचा अर्थ राग येणे किंवा नाराज होणे असा होतो. सॉरी या शब्दाचा फुलफॉर्म खूप कमी जणांना माहीत असेल. इंटरनेटवर उपलब्ध झालेल्या माहितीनुसार सॉरी या शब्दाचा फुलफॉर्म ऽशेपश ळी ीशरश्रश्रू ीशाशलशीळपस्रॅ असा होतो. अर्थातच नेटच्या मायाजालातील या माहितीची पुष्टी करता येत नाही! दक्षिणी ओरेगन युनिव्हर्सिटीतील एडविन बॅटीस्टेला आणि सॉरी अबाऊट देंट : द लँग्वेज ऑफ पब्लिक एपोलॉजी या पुस्तकाच्या लेखिकेने सांगितले की लोक सॉरी शब्दाचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने करतात. मानसशास्त्रानुसार जी व्यक्ती काही चूक नसताना सुद्धा लगेच सॉरी म्हणतात अशा व्यक्ती दुसऱ्यांचा विश्वास पटकन मिळवतात, पण काहीवेळा सारखं सॉरी म्हणणं मानसीकदृष्ट्या दुर्बल असल्याचं लक्षण मानलं जातं. ◆◆◆

## चार नद्या होतात गायब

भारतात नद्यांची संख्या इतकी आहे की, भारताला नद्यांचा देश म्हणतात. प्रत्येक नदीचे एक वैशिष्ट्य आणि स्टोरी आहे. नद्या वाहत वाहत समुद्रापर्यंत जातात आणि समुद्राला मिळतात, हे आपल्याला माहिती आहे; पण भारतातल्या अशा काही नद्या आहेत, ज्या समुद्रापर्यंत पोहोचतच नाही. मध्येच गायब होतात.

उत्तर प्रदेशातल्या इटावा जिल्ह्यातील जालौनमध्ये पचनद नावाचे हे ठिकाण आहे. या ठिकाणी पाच नद्यांचा संगम होतो. यात यमुना, चंबल, सिंध, कुंवारी आणि पहूज नद्यांचा समावेश आहे. यातील इतर नद्या यमुना नदीत मिसळतात. त्यांचे अस्तित्व संपते. पुढे फक्त यमुना नदी एकटीच बाकी राहते, जी गंगा नदीला मिळते. ◆◆◆



## पोषणजादू



पोषण ट्रॅकरमध्ये आपलं स्वागत आहे, असा मेसेज आल्याचं पाहून 'ती' भेदरलीच. वास्तविक गर्भारपणाच्या किंवा स्तनदा माता असण्याच्या काळात आपल्या आणि बाळाच्या योग्य पोषणासाठी सरकारने चालवलेले प्रयत्न पाहून 'ती' आनंदी व्हायला हवी होती. मग नेमकं उलट का झालं? कारण 'ती' अविवाहित होती. हा मेसेज घरातल्यांनी पाहिल्यावर तर कल्लोळच झाला. आता आपल्याला कुठे तोंड दाखवायची सोय उरली नाही, या जाणिवेनं घरातले सगळेच हादरले. कुणाला विचारायला जावं, तरी आफत!

ऐन दिवाळीत डोळ्यापुढे अंधार झाला. गावात फुटणारे फटाके त्रासदायक वाटू लागले. दिवाळीच्या शुभेच्छांसह ही कसली 'गुड न्यूज' आली, जिने फराळाची चवच घालवली? थोड्याच वेळात गावात आणखी एक 'ती' असल्याची माहिती मिळाली. तीही अविवाहित. दोन कुटुंबांमध्ये या मेसेजवरून संवाद झाला. काही वेळानं तिसरं कुटुंब या चर्चेत सहभागी झालं. बघता-बघता अशा मुलींची संख्या वाढत गेली, ज्या अविवाहित असतानाच माता झाल्या होत्या किंवा होणार होत्या. योग्य पोषण मिळण्यासाठी ताजं आणि गरम अन्न खावं, समुपदेशनासाठी आणि बालआरोग्य निरीक्षणासाठी अंगणवाडी केंद्राशी संपर्क साधावा, अशा सूचना त्या गावातल्या तब्बल चाळीस मुलींना मिळाल्या होत्या. कुणीतरी खोडसाळपणा केला असावा, असं म्हणावं तर मेसेज थेट सरकारी कचेरीतून आलेले. धक्क्यातून सावरल्यावर विचार आला, सरकारी कचेरीशीच कुणी खोडसाळपणा केला असेल तर?

उत्तर प्रदेशातल्या वाराणसी जिल्ह्यातलं महलिया नावाचं हे गाव ऐन दिवाळीत वेगळ्याच धामधुमीत गुरफटून गेलं. ग्रामस्थांना प्रश्न पडत गेले, तसा गुंता सुटत गेला. घरात गर्भवती महिला किंवा स्तनदा माता आहे, ही माहिती महिला आणि बालकल्याण विभागाच्या कचेरीला कोण देतं? हे सर्वेक्षण करण्याचं काम तर अंगणवाडी सेविकांचं. सबब, माहिती घेणाऱ्या अंगणवाडी सेविकेची ही चूक असावी, अशा निष्कर्षाप्रत गावकरी पोहोचले. प्रत्यक्षात अविवाहित असणाऱ्या; पण कागदावर गर्भवती दिसणाऱ्या या मुलींनी मग अंगणवाडी सेविकेलाच हा प्रश्न विचारला. काही प्रश्नांना या सेविकेने उत्तरच दिलं नाही, तर काहीजणींशी ती असभ्य भाषेत बोलली. त्यामुळं वेगळाच संशय येऊ लागला. ही 'चूक' नसून 'घोटाळा' असावा असं अनेकांना वाटलं आणि तेच खरं निघालं. मुलींनी आणि पालकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे या प्रकाराची तक्रार केली आणि चौकशीची मागणी केली. चौकशीत लक्षात आलं, की अंगणवाडी सेविकेनं गर्भवती आणि स्तनदा मातांना मिळणाऱ्या पोषण आहरात अपहार करण्यासाठी हे सगळं घडवून आणलं होतं. सहा महिन्यांपासून ती या मुलींच्या नावावर स्वतःच्या कुटुंबाचं 'पोषण' करत होती.

गावातल्या काही मुलींना तिने काही महिन्यांपूर्वी आधार कार्ड मागितलं. कारण विचारल्यावर सांगितलं, की आधार आणि मतदार ओळखपत्र 'लिंक' करायचं आहे. आधार कार्ड महिला आणि बालविकास विभागात नोंदवून घेतली आणि या मुली गर्भवती असल्याचं सांगितलं. प्रत्येक गर्भवतीला दरमहा एक किलो गहू, दीड किलो हरभऱ्याची डाळ आणि अर्धा लिटर तेल दिलं जातं. हा सगळा शिधा अंगणवाडी सेविकाच लंपास करत होती. योजना कुणासाठी आणि पोषण कुणाचं? आपल्याकडे हे वारंवार घडत असतं. फक्त 'ट्रिक्स' बदलतात.

## डिटेक्टिव्ह माश्या



जरा हटके

प्रथमग्रासे मक्षिकापातः म्हणजे पहिल्याच घासात माशी पडणं. एखाद्या कामात सुरुवातीलाच विघ्न येणं. 'माशी शिंकणं' या वाक्प्रचाराचा अर्थही जवळजवळ तोच. माश्या मारत बसणं म्हणजे निरुद्योगी बसून राहणं. ज्याच्या तोंडावरची माशीही उठत नाही, तो प्रचंड आळशी किंवा मंद. चांदोमामाला तूप रोटी खायला बोलवावं, तर तुपात नेमकी माशी पडते आणि चांदोबा उपाशी राहतो. एकंदरीत माशीविषयी चांगलं मत असणारा माणूस सापडणं अवघड. का सापडावा? हा कीटक चावत नाही; पण तोंडापुढे गुणगुणत राहून वैताग आणतो. अन्नपदार्थ चुकून जरी उघडा राहिला, तर लगेच त्यावर माशी येऊन बसते आणि सोबत आणलेले विषाणू अन्नात कालवून आपल्याला आजारी पाडते. माश्यांचा उपद्रव काय असतो, हे कचरा डेपोजवळच्या गावांमध्ये जाऊन पाहावं. कचरा डेपो अन्यत्र हलवावा, ही मागणी मान्य होत नसल्यामुळं घरदार सोडून कुटुंब दुसरीकडे स्थायिक झाल्याचीही उदाहरणं सापडतील. अशा या उपद्रवी माश्यांनी पोलिसांना एक गंभीर गुन्हा उघडकीस आणायला मदत केली, हे सांगून पटणार नाही. हे काम श्वानपथकातल्या प्रशिक्षित श्वानांचं. घटनास्थळ हुंगून ते आरोपींपर्यंत पोहोचतात. पण तपासी अधिकाऱ्यांनी जिथं हात टेकले, तिथं त्यांच्या मदतीला माश्या धावल्या. मध्य प्रदेशातल्या जबलपूर जिल्ह्यात घडलेल्या या घटनेनं सगळ्यांच्याच भुवया उंचावल्यात. काकाचा खून करणाऱ्या पुतण्याकडून गुन्ह्याची कबुली घेण्यात पोलिसांना यश आलं ते माश्यांमुळं!

झालं असं, की काका आणि पुतण्या दोघे दारू प्यायला गेले. काकाने दुकानातून बाटली घेतली. एका हॉटेलमधून जेवणाचं पार्सल घेतलं. मग दोघे शेतात जाऊन दारू प्यायले. घरी येताना पुतण्या एकटाच आला. नशेत दोघांची चुकामूक झाली, असं घरातल्यांना वाटलं असावं. पण काका रात्रभर आलाच नाही, तेव्हा कुटुंबीयांनी पोलिसात जाऊन तो बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांनी शोध घेतला असता शेतात काकाचा मृतदेह सापडला. हा खूनच असावा, असा संशय पोलिसांना आला. त्यामुळं काकाबरोबर असलेल्या पुतण्याकडे अर्थातच पोलिसांनी पहिल्यांदा चौकशी केली. आपल्याला काहीच माहीत नाही, हे पुतण्याचं म्हणणं पोलिसांनाही पटलं, कारण पुतण्या अवघा १९ वर्षांचा. काकाच्या चीजवस्तू गायब झाल्या नव्हत्या, त्यामुळं ही घटना लुटीच्या उद्देशानं झालेली नाही, हे पोलिसांनी ओळखलं. काकाचं कुणाशी वैर नाही, पैशांची देवाणघेवाण नाही... मग खून केला कुणी आणि कशासाठी? पोलिसांनी पुतण्याची पुन्हा चौकशी केली, तेव्हाही तो गप्पच राहिला. पण त्याच्या डोक्यावर घोंगावणाऱ्या माश्यांनी पोलिसांना 'क्लू' दिला. इतर कुणाच्याच दिशेला न जाणाऱ्या माश्या पुतण्याच्याच डोक्यावर का घोंगावत असतील..?

पोलिसांनी पुतण्याला शर्ट काढायला लावला आणि तो फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवला. शर्टाला रक्त लागलं होतं; पण ते दिसून येत नव्हतं. मग पोलिसांनी पुतण्याला 'नीट' विचारलं, तेव्हा तो कबूल झाला. दारू आणि पैशांवरून काका-पुतण्यांची भांडणं झाली होती. पुतण्याच्या म्हणण्यानुसार, काकाने त्याला पहिल्यांदा मारलं आणि चिडून पुतण्याने त्याच्यावर लाकडी दांडक्याने प्रहार केला. काका तिथेच गारद झाला. खरंतर अशा घटना बऱ्याचदा घडतात; पण अत्यंत रोगट म्हणून तिरस्करणीय असलेल्या माश्या डिटेक्टिव्ह बनल्या, हे या घटनेचं वैशिष्ट्य!

## फॉरेन्सिक तज्ज्ञांमुळे मिळाला
# बलात्कारपीडित मतिमंद महिलेला न्याय

**एका २५ वर्षीय मतिमंद महिलेवर बलात्काराचे हे प्रकरण आहे. या प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात होता. घटनेनंतर त्याला तत्काळ अटक करण्यात आली होती; मात्र आरोपीवरील गुन्हा सिद्ध करून त्याला कठोर शिक्षा देण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. याचे कारण पीडित महिला मानसिकदृष्ट्या विकलांग असल्याने न्यायालय तिच्या म्हणण्यावर कसा विचार करणार याबाबत पोलिस संभ्रमात होते. अशा परिस्थितीत पोलिसांनी निष्णात न्यायवैद्यक तज्ज्ञाची मदत घेऊन गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा दिली.**



तारीख होती १७ मे २०१९ दुपारची वेळ... ठिकाण कर्नाटकातील बागलकोट जिल्ह्यातील एक छोटेसे गाव. गावात देवळात जत्रा सुरू होती आणि सगळीकडे उत्सवासारखे वातावरण होते. याच गावात राहणाऱ्या मतिमंद महिलेचे कुटुंबही जत्रा पाहण्यासाठी गेले होते. ती घरी एकटीच होती. सायंकाळी चार वाजता त्यांचा मोठा भाऊ जत्रेतून परतला तेव्हा बहिणीची अवस्था पाहून तो हादरला. सदर २५ वर्षीय महिलेवर बलात्कार करण्यात आला होता. तिच्या शरीरावर चाव्याच्या खुणा होत्या.

खरे तर आजवर कुटुंबाने तिला कधीही एकटे सोडले नव्हते; पण त्या दिवशी, कुटुंबातील सदस्य एका तासात परत येऊ, या विचाराने जत्रेला गेले होते. त्यातूनही महिलेचा मोठा भाऊ लवकर घरी परतला, पण तोपर्यंत सदर पीडितेबाबत अनुचित प्रकार घडला होता.

ही बाब पोलिसांना कळवण्यात आली आणि महिलेला तात्काळ बागलकोट येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पीडितेला चांगलाच धक्का बसला होता. ती कोणाशीही बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हती. त्यामुळे तिच्याकडून कोणताही सुगावा मिळू शकणार नसल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. दरम्यान, पोलीस अधिकारी महिलेच्या घरी पोहोचले आणि तपासादरम्यान पीडितेचा मोबाईल गायब असल्याचे आढळून आले.

ही बातमी गावात पसरली आणि महिलेवर बलात्कार झाल्याच्या घटनेने खळबळ उडाली. पोलिसांनी पीडितेच्या मोबाईलचे लोकेशन तपासले असता मोबाईलचोर अजूनही त्याच गावात सक्रिय असल्याचे आढळून आले. तात्काळ पोलिस अधिकाऱ्यांनी संपूर्ण गावात शोध सुरू केला आणि लवकरच कळले की पीडितेचा मोबाइल २६ वर्षीय हनुमंत मगंडप्पा वापरत आहे. हनुमंत हा ड्रायव्हर म्हणून काम करायचा पोलिसांनी त्याला तत्काळ अटक केली

पोलिस चौकशीत हनुमंतने सदर महिला कोणाला काही सांगणार नाही आणि तिचे कुटुंबीय तक्रार देण्यासही धजावणार नाहीत, असे समजून तिच्यावर बलात्कार केल्याचे उघड झाले. त्यानेच पीडितेचा मोबाईलही चोरल्याचे मान्य केले. अटकेनंतर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध आरोपपत्र तयार करण्यास सुरुवात केली. आरोपी पोलिसांच्या ताब्यात असला तरी त्याला शिक्षा होण्यात अनेक आव्हाने होती.

पीडित महिला ही मानसिकदृष्ट्या अस्वस्थ होती. त्यामुळे न्यायालयात तिची केस कशी उभी करायची याबाबत पोलीस संभ्रमात पडले होते. आरोपीविरुद्ध कोर्टात भक्कम केस हजर व्हावी, अशी पोलिसांची इच्छा होती. धारवाडच्या एसडीएम कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेसच्या फॉरेन्सिक विभागाचे प्रमुख प्राध्यापक आशित आचार्य पोलिसांसाठी आशास्थान म्हणून पुढे आले. आशित आचार्य यांनी यापूर्वी अनेक कायदेशीर प्रकरणांमध्ये पोलिसांना मदत केली होती. २०१२ च्या निर्भया सामूहिक बलात्कार प्रकरणात दातांचा फॉरेन्सिक अहवाल देण्यातही आचार्य यांची महत्त्वाची भूमिका होती. पोलिसांनी आचार्य यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांनी केवळ मदतच नाही तर न्यायालयासमोर जबाब देण्याचेही मान्य केले.

असा लागला छडा

प्रा. आचार्य यांनी पीडितेच्या शरीरावरील चाव्याच्या खुणा आणि आरोपीच्या दातांचा फॉरेन्सिक अहवाल तयार केला. न्यायालयासमोर दिलेल्या जबानीत त्यांनी साधार हे सांगितले की, चाव्याच्या खुणाची छायाचित्रे घेतल्यानंतर आरोपीच्या दातांच्या रचनेशी त्याचे विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार पीडितेच्या शरीरावरील चाव्याच्या खुणा आणि आरोपीच्या दातांचे वक्र जुळत आहेत.

२१ जुलै २०२३ रोजी बागलकोट न्यायालयाने हनुमंतला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. कोर्टाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, खटल्यातील तथ्ये आणि आरोपीने केलेले घृणास्पद कृत्य लक्षात घेता, त्याच्याबाबत उदारता दाखवता येणार नाही. आरोपींवर कडक कारवाई झाली पाहिजे, जेणेकरून भविष्यात असे कृत्य करण्यास कोणी धजावणार नाही. ◆◆◆



पैगंबर जयंतीनिमित्त तख्ती दरवाजा मस्जिदच्या आकर्षक रोषनाईचे ठाकूरदास परदेशी यांनी टिपलेले छायाचित्र.

# उच्चशिक्षण विभागात पवित्र पोर्टलद्वारे प्राध्यापक व शिक्षकेतरांची नियुक्ती करा; शासन आदेश निर्गमित करण्याची शिक्षक परिषदेची राज्य सरकारकडे मागणी

### गुणवत्तेला महत्त्व प्राप्त होऊन लक्ष्मी दर्शनाला पायबंद होणार : बाबासाहेब बोडखे



नगर – उच्चशिक्षण विभागात गुणवत्तेच्या आधारावर पवित्र पोर्टलद्वारे प्राध्यापक व शिक्षकेतरांची नियुक्ती होण्यासाठी शासन आदेश निर्गमित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नागो गाणारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मुख्य सचिव व उच्च शिक्षण संचालक यांना निवेदन पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

राज्यातील उच्च शिक्षण विभागात रखडलेली ५५०० प्राध्यापक व २९०० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीचा मार्ग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता देऊन मोकळा केला असल्याची घोषणा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. या निर्णयाचे शिक्षक परिषदेच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे.

मात्र प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती गुणवत्तेच्या आधारावरच व्हावी व लक्ष्मी दर्शनाला किंचितही वाव मिळू नये. या पवित्र हेतूने सदर नियुक्त पवित्र पोर्टलमार्फत करण्याचा शासन निर्णय आदेश तात्काळ निर्गमित करण्यासाठी शिक्षक परिषदेच्या वतीने पाठपुरावा सुरु करण्यात आला आहे. यापूर्वी प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी सुमारे ७० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात सुमारे ४० ते ५० लाख रुपयांपर्यंतचे लक्ष्मी दर्शन झाल्याची सर्वत्र चर्चा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्राध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्याशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकणार नाही. अशा अत्यंत महत्त्वपूर्ण घटकाची प्राध्यापक नियुक्ती सुमारे ७० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतच्या लक्ष्मी दर्शनाने होत असेल तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टयाबाबत चिंतन करणे व्यर्थ ठरेल. प्राध्यापक व कर्मचारी यांची नियुक्ती गुणवत्तेच्या आधारावरच करण्याच्या हेतूने पवित्र पोर्टल तयार करणे व त्या आधारावर नियुक्त्या करण्याचा आदेश निर्गमित करणे काळाची गरज आहे. यामुळे गुणवत्तेला महत्त्व प्राप्त होऊन गुणवत्तेचा सन्मान होणार आणि लक्ष्मी दर्शनाला पायबंद होणार असल्याचे म्हटले आहे.

शालेय शिक्षण विभागात सन २०१७ पासून पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षक नियुक्ती मधील लक्ष्मी दर्शन पूर्णपणे संपुष्टात आले नसेल, तरी सुद्धा मोठ्या प्रमाणात लक्ष्मी दर्शनावर नियंत्रण आलेले आहे. गुणवत्तेच्या आधारावर शिक्षकांच्या नियुक्त करण्यात येत आहे. हा अनुभव विचारत घेऊन उच्च शिक्षण विभाग सुद्धा प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या पवित्र पोर्टल मार्फत करण्याचा निर्णय घेतल्यास गुणवत्तेला मोठ्या प्रमाणात प्राधान्य मिळणार आहे, असे बाबासाहेब बोडखे म्हणाले.

# आंतरजातीय विवाह सामाजिक स्वातंत्र्याचा शस्त्रप्रहार ठरणार

### ॲड. कारभारी गवळी यांची माहिती, आंतरजातीय विवाहाच्या प्रोत्साहनासाठी एंडोगॅमीविरोधी सामाजिक स्वातंत्र्यसैनिकांची नोंदणी अभियान

नगर – पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने एंडोगॅमी म्हणजे स्वजात विवाहाची सक्ती तोडून सामाजिक गुलामीतून मुक्त करण्याच्या दिशेने एंडोगॅमीविरोधी सामाजिक स्वातंत्र्यसैनिकांची नोंदणी अभियान सुरु करण्यात आले आहे. जातिव्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या एंडोगॅमीला तोडून टाकण्याच्या आणि समाजाला सामाजिक गुलामीतून मुक्त करण्याच्या दिशेने हे ऐतिहासिक पाऊल उचलले गेल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली आहे.

भारताला शतकानुशतकं गुलाम ठेवणारं मूळ कारण म्हणजे जाति आणि एंडोगॅमी आहे. १९४७ मध्ये राजकीय स्वातंत्र्य मिळालं, पण सामाजिक स्वातंत्र्य आजही अधुरं आहे. एंडोगॅमी तोडल्याशिवाय भारत महासत्ता होऊ शकत नाही. भारतीय संविधानालाही या लढ्याचा भक्कम आधार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

भारतीय संविधानाच्या कलम १४ आणि १५ समानतेचा आणि भेदभावविरोधाचा हक्क, कलम १७ अस्पृश्यतेवर संपूर्ण बंदी, कलम १९ व २१ विचारस्वातंत्र्य आणि विवाहातील निवडीचं स्वातंत्र्य आहे. सर्वोच्च न्यायालयानेही विविध निकालांत आंतरजातीय विवाह हा संविधानिक हक्क असल्याचे स्पष्ट केले आहे. १३ सप्टेंबर २०२५ पासून ही नोंदणी मोहीम सुरू होणार असून, त्या दिवसापासून भारतातील प्रत्येक आंतरजातीय विवाह हा केवळ वैयक्तिक निर्णय न राहता सामाजिक स्वातंत्र्याचा शस्त्रप्रहार ठरणार असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हटले आहे.

प्रत्येक आंतरजातीय विवाह म्हणजे सामाजिक गुलामीविरुद्धचा प्रहार आहे. नोंदणी करणारा प्रत्येक युवक/युवती म्हणजे सामाजिक स्वातंत्र्यसैनिक ठरणार आहे. एंडोगॅमीमुक्त भारत खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यप्राप्त भारत आहे. युवक–युवतींना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आले आहे.

# मंडळाच्या ५५ वर्षांच्या इतिहासाचे 'बाणेश्वर'तर्फे छायाचित्रांचे प्रदर्शन



बाणेश्वर तरुण मंडळाच्यावतीने मंडळाचा ५५ वर्षाचा इतिहास छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री विश्वेश्वर स्वामी महाराज राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते झाले.

नगर – बाणेश्वर तरुण मंडळाच्यावतीने मंडळाच्या ५५ वर्षांच्या इतिहासाच्या छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. गणेश विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशीपर्यंत म्हणजेच ७ सप्टेंबरपर्यंत हे प्रदर्शन नगरकरांसाठी सुरू राहणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री विश्वेश्वर स्वामी महाराज राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते झाले. त्याच प्रमाणे शिवकालीन युद्धकलेचे सादरीकरण मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक बीड येथील शिवशंभू मर्दानी आखाड्याच्या माध्यमातून करण्यात आले.

यावेळी नाना भोरे, राजेश राठोड, प्रकाश सैंदर, सतीश मैड, बाळू काबरा, बाळू मालू, राजू कलमदाने, राजू पारिक, खंडू महाराज, किशोर डागवाले यांचा सन्मान करण्यात आला.

मंडळाची स्थापना ज्या उद्देशाने करण्यात आली तेच कार्य यापुढे देखील अबाधित राहील अशी ग्वाही मंडळाचे अध्यक्ष सुमित वर्मा यांनी दिली.

मंडळाच्या प्रमुख मार्गदर्शक धर्मवीर जगदीश भोसले यांच्या भगिनी राधाताई भोसले यांनीही मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मार्गदर्शक महावीर कांकरिया यांनी केले. तसेच उपाध्यक्ष पवन खंडेलवाल, यश सावेकर, सचिव प्रसाद भोसले, सहसचिव शुभम मेहेर, कमलेश भंडारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

यावेळी गोटु महाराज, सचिन चोपडा, निलेश मेहेरवाल, सचिन गुप्ता, मामा कांकरिया, संदेश वखारीया, सुनील सुपेकर, मयुर मैड, रामा फुलडहाळे, कालीचरण गुप्ता, राहुल सारडा, आलोक कर्नावट, सुरेश मेहेर, शौकत शेख, शुभम खंडेलवाल, बंटी काबरा, शिव मित्र प्रतिष्ठान चे कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र सेट परीक्षेत दिलीप जाधव उत्तीर्ण



नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत जून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सहाय्यक प्राध्यापक पात्रता (सेट) परीक्षेत रतडगावचे प्राथमिक शिक्षक दिलीप जाधव यांनी यश संपादन केले आहे. मराठी विषयात त्यांनी पात्रता मिळवत गावाचे नाव उज्वल केले.

जाधव हे आगडगाव येथील असिस्टंट ब्रांच पोस्ट मास्टर भाऊसाहेब जाधव यांचे चिरंजीव असून सध्या ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खांडके (ता. व जि. अहिल्यानगर) येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. अभ्यासाबरोबरच अध्यापनाची जबाबदारी सांभाळत त्यांनी हे यश मिळवले आहे.

या परीक्षेच्या तयारीसाठी प्रा. डॉ. भाऊसाहेब मुळे, प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.



माणिक चौकातील महावीर प्रतिष्ठानच्या पंचमुखी हनुमान अवतार, अहिरावण चा वध या देखाव्याचे उदघाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी उद्योजक नरेंद्र फिरोदिया, डॉ. प्रकाश कांकरिया, सौ. सुधा कांकरीया, आनंदराम मुनोत, माणिकराव विधाते, सिध्दार्थ गांधी, संभाजी कदम, कमलेश भंडारी, किरण शिंगी, अतुल शिंगवी, संतोष गांधी, हर्षल गुगळे, मंडळाचे अध्यक्ष हर्षल बोरा, राकेश भंडारी, आशिष चोपडा, श्रीपाल शिंगी, अमित फिरोदिया, पुष्कर तांबोळी, स्वप्नील मुनोत, रितेश पारख, निखील गांधी, प्रसाद बोरा, प्रसन्न भंडारी, दश्रन चाणोदिया, आनंद गांधी, रोहित गांधी, सुजीत कटारीया, आशिष गुंदेचा, चेतन गुंदेचा, सोमनाथ मुळे आदी उपस्थित होते.

# सारडा महाविद्यालयाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार डॉ. नितीन घोरपडे यांना जाहीर



नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आलेल्या 'स्व. प्राचार्य एस.एम. कुलकर्णी' आदर्श प्राचार्य पुरस्कार यावर्षी हडपसर येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांना जाहीर करण्यात आला आहे. पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. रुपये २५ हजार रोख, गौरवचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे वितरण १० सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांच्या हस्ते सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे, अशी माहिती सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी दिली.

सारडा महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर १९६२ ते १९७४ या काळात प्रथम प्राचार्य, तसेच द्रष्टा शिक्षणतज्ज्ञ म्हणून प्राचार्य एस.एम. कुलकर्णी कार्यरत होते. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त तीन वर्षांपूर्वी हा आदर्श प्राचार्य पुरस्काराचा उपक्रम सारडा महाविद्यालयाने सुरु केला. आदर्श प्राचार्य पुरस्काराच्या निवड समितीचे चेअरमन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखालील समितीत सिनेट सदस्य सागर वैद्य व न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्यासह हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर व प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित आदिंचा समावेश आहे.

आदर्श प्राचार्य पुरस्कार घोषित झालेले प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे हे गेली १७ वर्षांपासून प्राचार्य पदावर असून सामाजिक कार्य आणि पर्यावरण विषयक समस्यांमध्ये अधिक कर्तव्यदक्ष आहेत. त्याचबरोबर त्यांनी कम्युनिकेशन स्किल, लाइफ स्किल, शॉर्ट स्किल, टेक्नॉलॉजी अवेअरनेस, टाईम मॅनेजमेंट या विषयावर भरीव योगदान दिले आहे. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच संशोधनासाठी त्यांनी योगदान दिले आहे. या निकषांवर डॉ.घोरपडे यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. रमेश झरकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्रशासकीय अधिकारी ॲड.अनंत फडणीस व सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा व अजित बोरा आदींसह सर्व प्राध्यापक व संयोजन समिती सदस्य नियोजन करत आहेत. या पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजन समितीच्या समन्वयक डॉ. संगीता शेळके, उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ.सुजित कुमावत, डॉ.राजू रिक्कल व प्रा.महेश कुलकर्णी, प्रबंधक अशोक असेरी आदींनी केले आहे.





शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त सामुहिक अथर्वशिर्ष पठण, शंखनाद व महाआरती करण्यात आली. यावेळी महिला उपस्थित होत्या.

# श्री विशाल गणेश मंदिराचा परिसर महिलांच्या सामुहिक अथर्वशिर्ष पठणाने दुमदुमला

नगर – शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त सामुहिक अथर्वशिर्ष पठण व महाआरती करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर विणा दिघे, अमृता बेडेकर, सरोज पालडीया, अनिता इवले, सोनाली भांडेकर, पूनम ताठे, सोनाली पुंडे, अंजली दंडवते, जोत्स्ना जामगांवकर, आसावरी नातू, अश्विनी वाळुंजकर आदिंनी अथर्वशिर्ष पठणास प्रारंभ केला. यावेळी रेखा झंवर व त्यांच्या सहकारी महिलांनी शंखनाद केला.

या अथर्वशिर्षमध्ये असंख्य महिला सहभागी झाल्या होत्या. पारंपारिक वेशभुषा, एक ताल–सुरात अथर्वशिर्षने परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी देवस्थान ट्रस्टच्यावतीने प्रातिनिधीक स्वरुपात महिलांचा सन्मान केला, त्यानंतर महाआरती करुन प्रसाद वाटपाने सांगता झाली.

या अथर्वशीर्ष साठी नितीन पुंड, आण्णा चौधरी, प्रणित अनमल, राजेश एकाडे, राजू जग्गी, गणेश पालवे, वैभव जगताप, सतीश पठारे, किशोर सुडके, संदीप बेरड, प्रदीप झोडगे, राहुल धोकरिया, गणेश आंबेकर, सुधीर सूळ, सुहास दुर्गे, विनायक कानडे, बाळासाहेब व्यापारी, गिरीश पुप्पाल, चंद्रकांत फुलारी आदिंनी सहकार्य केले.

याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, विजय कोथिंबीरे, रंगनाथ फुलसौंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, माणिकराव विधाते, संजय चाफे, नितिन पुंड आदिंसह पुजारी संगमनाथ महाराज उपस्थित होते.

यावेळी सरोज पालडीया यांनी मधुर गायनाने मंत्रमुग्ध केले. सुत्रसंचालन विना दिघे यांनी केले. ॲड. अभय आगरकर यांनी आभार मानले. प्रास्तविक नितीन पुंड यांनी केले. यावेळी उपस्थित सर्व महिलांच्या हस्ते सामूहिक महाआरती करण्यात आली तर मुकुंद शास्त्री मुळे यांनी प्रार्थना करून सांगता केली.

# शेतकरी गटांनी अर्ज करावेत

नगर – रब्बी २०२५–२६ हंगामासाठी अन्नधान्य पिके, वाणिज्यिक पिके आणि तेलबिया पिकांअंतर्गत पीक प्रात्यक्षिके या घटकासाठी शेतकरी गटांनी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान (अन्नधान्य व वाणिज्यिक पिके) तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया पिके) अंतर्गत रब्बी हंगामात कडधान्य, पौष्टिक तृणधान्य, ऊस आणि सूर्यफूल या पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश ठेवून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

पीक प्रात्यक्षिकासाठी कोणत्याही शासकीय यंत्रणेकडे ३१ मार्च २०२४ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी आणि कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था पात्र आहेत. गटाने प्राधिकृत सदस्यामार्फत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावा. ही सुविधा २ सप्टेंबर पासून उपलब्ध आहे.

गटांची निवड पहिले येईल त्याला पहिले प्राधान्य (FCFS) या तत्त्वावर करण्यात येईल. अर्ज सादर करताना https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin/griLogin

या संकेतस्थळावर बियाणे वितरण, प्रात्यक्षिक, फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते या टाईल अंतर्गत शेतकरी गटांना अर्ज सादर करता येईल. शासनाच्या धोरणानुसार अर्ज करणाऱ्या आणि लाभ घेणाऱ्या गट सदस्याकडे Farmer ID असणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.



शिक्षकांसमवेत विभागीय पातळीवर निवड झालेल्या नय्यर विद्यालयाच्या खो खो संघातील खेळाडू विद्यार्थिनी.

# नय्यर विद्यालयाच्या खो खो संघाची विभागीय पातळीवर निवड

नगर – अहिल्यानगर मनपा व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित खो खो स्पर्धेत १४ वर्ष मुलींचा संघ प्रथम आला. त्या संघाची विभागीय पातळीवर खेळण्यासाठी निवड झाली तसेच १४ वर्ष मुलांचा संघ द्वितीय व १७ वर्ष मुलींचा संघ द्वितीय आला. आट्यापाट्या स्पर्धेत १४ वर्ष मुली द्वितीय, १४ वर्ष मुले तृतीय, १७ वर्ष मुले तृतीय, १९ वर्ष मुले द्वितीय व १९ वर्ष मुली तृतीय आल्या. सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे पदाधिकारी काकाशेठ नय्यर, श्री. आंधळे, श्री. गोरे, श्री. सातपुते, श्री. काकड, श्री. लिपाणे, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार व प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ मोटे यांनी अभिनंदन केले व क्रीडा शिक्षक संतोष नागरगोजे, कोच अजय जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# मसापाच्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अभिनेत्री गौरी देशपांडे व स्वागताध्यक्षपदी अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव





नगर – महाराष्ट्र साहित्य परिषद व न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ११ व १२ सप्टेंबरला होणाऱ्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अभिनेत्री नव्या 'शामची आई' चित्रपट फेम गौरी देशपांडे यांची निवड झाली आहे. तसेच संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व रेणुकामाता मल्टीस्टेट पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन डॉ.प्रशांत भालेराव यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती मसपाच्या सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

मसपच्या सावेडी शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलूलकर म्हणाले, अहिल्यानगर शहरात न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयात होणाऱ्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाची जय्यत तयारी सुरु आहे. संमेलनाचे यशस्वी व उत्कृष्ट नियोजनासाठी सर्व समित्यांचे पदाधिकारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. या संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळणारे अर्थतज्ज्ञ डॉ.प्रशांत भालेराव हे साहित्य व सांस्कृतिक क्षेत्राची आवड असलेले राज्यात नावाजलेले व्यक्तिमत्व आहे. त्यांनी साहित्य, आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व अर्थ क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे.

संमेलनाच्या अध्यक्षा अभिनेत्री गौरी देशपांडे या संवेदनशील लेखिका व उत्तम समिक्षक आहेत. त्यांनी उत्कृष्ट अभिनयाच्या माध्यमातून युवा मनावर अभिराज्य गाजवले आहे.

न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे म्हणाले, न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयात हे राज्यस्तरीय साहित्य व नाट्य संमेलन होत असल्याचा आनंद महाविद्यालयास झाला आहे. अर्थतज्ज्ञ डॉ.प्रशांत भालेराव व अभिनेत्री गौरी देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे संमेलन नक्कीच वेगळ्या उंचीवर जाऊन यशस्वी होईल.

